मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले

उपसंपादक - श्री विलास गायकवाड • कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे • निवासी संपादक - श्री राकेश पाटील • सह संपादक - श्री मुकुंद कांबळे • महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे • कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ अंक : २९२ रविवार, ०५ जुलै २०२६ किंमत : २ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514




# नवी मुंबई विमानतळ नामकरण

## ८ जुलै रोजी विधिमंडळावर धडकणार 'दिबाप्रेमींचा' भव्य मोर्चा!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी येत्या 8 जुलै रोजी मुंबईतील विधानभवनावर एक भव्य आणि ऐतिहासिक मोर्चा काढण्यात येणार आहे. विमानतळाच्या नामकरणाला शासनाकडून होणाऱ्या दिरंगाईमुळे आणि दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न झाल्यामुळे समस्त दिबाप्रेमी आणि भूमिपुत्रांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. या संदर्भात आज करंजाडे येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत लोकनेते दिबाप्रेमी नामकरण समितीने राज्य व केंद्र सरकारच्या विरोधात संताप व्यक्त केला आहे.

या पत्रकार परिषदेला माजी आमदार बाळाराम पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, सामाजिक कार्यकर्ते कांतिलाल कडू, उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर, अतुल म्हात्रे, सरपंच अहिल्या बाळाराम नाईक, सामाजिक कार्यकर्ते निलेश गायकवाड, सचिन केणी, बाळाराम नाईक, सुनील कटेकर, हेमराज म्हात्रे, काशिनाथ पाटील, महेंद्र नाईक, संतोष घरत, शंकर म्हात्रे, तेजस्वीनी घरत यांच्यासह अनेक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना माजी आमदार बाळाराम पाटील यांनी सांगितले की, तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी, संघर्ष समितीचे कार्यकर्ते आणि दिबाप्रेमींना विमानतळाच्या नामकरणाबाबत



दोन महिन्यांत निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, अनेक महिने उलटूनही त्यावर कोणतीही ठोस कृती न झाल्याने अखेर आंदोलनाचा पवित्रा घेण्यात आला आहे. तर मा.आ.मनोहरशेठ भोईर यांनी सांगितले की, महायुतीच्या काळात जाणीवपूर्वक दुर्लक्ष झाल्याने हे आंदोलन होऊ शकले नव्हते; परंतु आता आलेली कसर भरून काढण्यासाठी 8 जुलै रोजी सर्व दिबाप्रेमी रस्त्यावर उतरणार आहेत. या आंदोलनाची धार अधिक तीव्र करण्यासाठी पनवेल, उरणसह नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातून मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होणार असल्याचे सांगितले की, तर सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांनी सांगितले की, आंदोलक रश्मिता पोपेटा यांनी तब्बल 6 दिवस अन्न-पाणी न घेता कठोर उपोषण केले होते. प्रकृती खालावल्यामुळे त्यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असले तरी, त्यांनी रुग्णालयातूनच आपल्या आंदोलनाची पुढील रणनीती जाहीर केली आहे. त्यांच्या या त्यागामुळे संपूर्ण दिबाप्रेमींमध्ये न्यायासाठी लढण्याची एक नवीन ऊर्मी निर्माण झाली आहे. या भव्य मोर्चाचे नियोजन अत्यंत सूक्ष्म पद्धतीने करण्यात आले असून, आंदोलनाची सुरुवात पनवेल शहरातील ऐतिहासिक छत्रपती शिवाजी महाराज चौकातून होणार आहे. आंदोलक रश्मिता पोपेटा यांच्या हस्ते पारंपरिक पद्धतीने नारळ वाढवून मोर्चा मार्गस्थ केला जाईल. त्यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले जाईल आणि मोर्चा एसटी स्टँडमार्गे कळंबोलीच्या दिशेने मार्गस्थ होईल. मुंबईकडे कूच करणाऱ्या या हजारो आंदोलकांच्या दुपारच्या भोजनाची व विश्रांतीची सोय सानपाडा येथील प्रसिद्ध दत्त मंदिर परिसर येथे करण्यात आली आहे. या ऐतिहासिक संघर्षामध्ये पनवेल, उरण, रोहा, पेण, अलिबाग, खालापूर, कर्जत, ठाणे, नवी मुंबई, कल्याण, भिवंडी, वसई-विरार आणि पालघर या संपूर्ण पट्ट्यातून सुमारे 15 हजारांपेक्षा जास्त समाजबांधव आणि दिबाप्रेमी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी होणार आहेत. यावेळी नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी सांगितले की, या आंदोलनाला विविध महिला संघटना, आगरी समाज संघटना, बैलगाडा संघटना, 27 गाव संघटना तसेच अनेक प्रमुख राजकीय पक्षांनी आपला जाहीर पाठिंबा दिला आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच आंदोलनाची पूर्वकल्पना देण्यासाठी समितीच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती आणि नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्यासह स्थानिक प्रशासनाला अधिकृत लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे. विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही, असा निर्धार यावेळी आंदोलकांनी व्यक्त केला आहे.

## खड्डे बुजवत पनवेल शहर वाहतूक पोलिसांचा आदर्श उपक्रम; नागरिकांकडून कौतुक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल | प्रतिनिधी :** सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे डेरवली ते पळस्पे मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनचालक आणि नागरिकांना वाहतुकीदरम्यान मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत पनवेल शहर वाहतूक शाखेच्या पोलिसांनी पुढाकार घेत रस्त्यावरील खड्डे बुजवून जनतेसमोर सेवाभावी कार्याचा आदर्श ठेवला आहे.वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भालचंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार साबळे आणि पोलीस अंमलदार भोळे यांनी वाहतूक नियंत्रणाच्या जबाबदारीसोबतच रस्त्यावरील धोकादायक खड्डे बुजवण्याचे काम हाती घेतले. मुसळधार पाऊस,



चिखल आणि प्रतिकूल वातावरणाची पर्वा न करता त्यांनी हे काम पूर्ण केले.या मार्गावरून दररोज मोठ्या संख्येने वाहने प्रवास करीत असतात. खड्ड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता वाढली होती. मात्र पोलिसांच्या या तत्परतेमुळे वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला असून वाहतूक अधिक सुरक्षित झाली आहे."जनतेची सेवा हीच खरी कर्तव्यपूर्ती" या भावनेतून करण्यात आलेल्या या उपक्रमाचे नागरिकांकडून विशेष कौतुक होत आहे. जनहितासाठी सदैव तत्पर असलेल्या पनवेल शहर वाहतूक शाखेच्या या कार्यामुळे पोलिसांविषयीचा विश्वास आणखी दृढ झाला आहे.वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार साबळे आणि पोलीस अंमलदार भोळे यांनी दाखविलेली सामाजिक बांधिलकी व कर्तव्यनिष्ठा ही इतरांसाठी प्रेरणादायी ठरत असून त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून स्वागत केले जात आहे.

## रस्त्याच्या मधोमध क्वीन्स केअर हॉस्पिटलचा फलक; वाहतूक व नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

**दैनिक युवक आधार**

**कल्याण रमेश राऊत, ग्रामिण प्रतिनिधी :** शिळफाटा परिसरातील क्वीन्स केअर हॉस्पिटलचा जाहिरात फलक रस्त्याच्या मधोमध उभारण्यात आला आहे. हा रस्ता मुख्य रहदारीचा आहे या फलकामुळे वाहनचालकांचा दृष्टीक्षेप अडथळला जात असून, अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, संध्याकाळी ट्रॅफिकच्या वेळेस वाहन चालकांना सुद्धा येथून वाहन नेण्यास अडथळा निर्माण होत आहे



विशेषतः रात्रीच्या वेळी तसेच पावसाळ्यात हा फलक अधिक धोकादायक ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. संबंधित फलकासाठी आवश्यक परवानगी घेण्यात आली आहे का, तसेच तो वाहतूक नियमांचे पालन करून उभारण्यात आला आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

जरी परवानगी घेऊन लावण्यात आला असेल तरी तो फलक रस्त्याच्या मधोमध कसा लावण्यात आला आणि त्याला कशी परवानगी दिली याबाबतही नागरिकांना प्रश्न पडला आहे


या फलकाची महापालिका आणि वाहतूक विभागाने तातडीने दखल घेऊन पाहणी करावी, नियमबाह्य असल्यास संबंधित फलक त्वरित हटवावा आणि जबाबदारांवर कारवाई करावी.




## अतिवृष्टी, भूस्खलन व दरड कोसळण्याच्या पार्श्वभूमीवर पोलादपूर–महाबळेश्वर (आंबेनळी) घाट 3 ते 6 जुलैदरम्यान वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** पावसाळ्यात अतिवृष्टी, भूस्खलन, दरड कोसळणे तसेच सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने उद्भवणारा धोका लक्षात घेऊन पोलादपूर–महाबळेश्वर (आंबेनळी) राज्य महामार्ग (SH-139) दि.3 ते दि. ६ जुलै 2026 या कालावधीत सलग चार दिवस सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी किशन ना. जावळे यांनी जारी केले आहेत. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या कार्यकारी अभियंत्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, पोलादपूर–आंबेनळी–महाबळेश्वर हा राज्य महामार्ग सह्याद्री पर्वतरांगेतील अत्यंत संवेदनशील, भूस्खलनप्रवण व दरडप्रवण घाट विभागातून जातो. या



मार्गावरील तीव्र उतार, खोल दऱ्या, नैसर्गिक जलप्रवाह, हवामानामुळे विदीर्ण झालेले बेसॉल्ट खडक, अस्थिर मातीचे थर आणि दाट वनक्षेत्र यामुळे पावसाळ्यात हा मार्ग अत्यंत धोकादायक बनतो.

भारतीय हवामान विभागाच्या नोंदीनुसार या परिसरात दरवर्षी अतिमुसळधार पर्जन्यवृष्टी होत असून, अल्प कालावधीतही तीव्र स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता असते. त्यामुळे उतारांची स्थिरता कमी होऊन भूस्खलन, दरड कोसळणे, दगड घसरणे, भूस्तर खचणे, वृक्ष उन्मळून पडणे तसेच रस्त्यावरून वेगाने पाणी वाहणे अशा घटना कोणतीही पूर्वसूचना न देता घडू शकतात. यामुळे सार्वजनिक वाहतुकीस गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.तसेच घाट परिसरात मोठ्या प्रमाणावर दरडी व दगड रस्त्यावर कोसळणे, भरावांची धूप होऊन रस्ता खचणे, खोल दऱ्यांच्या बाजूचा रस्ता कमकुवत होणे, दाट धुके व कमी दृश्य अंतरामुळे अपघातांचा धोका वाढणे तसेच बचाव व आपत्कालीन यंत्रणांच्या हालचालींमध्ये अडथळे निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. यापूर्वीही अशा प्रतिकूल हवामानाच्या परिस्थितीत आंबेनळी घाटात भूस्खलन, दरड कोसळणे, वृक्ष पडणे व वाहतूक विस्कळीत होण्याच्या घटना घडल्या असून, सार्वजनिक सुरक्षिततेला प्राधान्य देत वेळोवेळी घाटबंदीचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यामुळे संभाव्य जीवितहानी व अपघात टाळण्यास मदत झाली होती.

तहसीलदार तथा अध्यक्ष, तालुका आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पोलादपूर यांनीही दि.3 ते 6जुलै 2026 या कालावधीत आंबेनळी घाट सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद ठेवण्याची शिफारस केली होती. तसेच पोलीस अधीक्षक, रायगड यांनी अवजड वाहतूक पूर्णपणे बंद ठेवणे आवश्यक असल्याचे तसेच ऑरेंज व रेड ॲलर्टच्या कालावधीत हलक्या वाहनांनाही प्रवेश बंद ठेवण्याबाबत अभिप्राय सादर केला होता.

## मुक्ताबाई हॉस्पिटल–खंडोबा मंदिर मार्गावर दरडसदृश्य परिस्थिती; तातडीच्या उपाययोजनांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर (केतन भोज):** सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे घाटकोपर (पश्चिम) येथील मुक्ताबाई हॉस्पिटल मार्गावरून खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यालगतच्या डोंगराची मोठ्या प्रमाणात माती ढासळत आहे. त्यामुळे या परिसरात दरडसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.रस्त्यालगत असलेल्या डोंगरावरून मातीचा मोठा भाग कोसळण्याच्या स्थितीत असल्याने या मार्गाने ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.पावसाचा जोर कायम राहिल्यास माती दरडसदृश्य भाग



घसरण्याची शक्यता असल्याने मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.स्थानिक नागरिकांनी संबंधित प्रशासनाकडे तातडीने घटनास्थळी पाहणी करून धोकादायक भाग सुरक्षित करून संरक्षणात्मक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.तसेच भविष्यात कोणतीही दुर्घटना होऊ नये यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी,अशी ही मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

# कलावंतांच्या रखडलेल्या मानधनाचा प्रश्न विधिमंडळात

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्यानंतर शासनाकडून सुधारणा व तातडीच्या कार्यवाहीचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कलावंतांना देण्यात येणाऱ्या मासिक अर्थसहाय्य योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी, रखडलेले मानधन आणि पात्र कलाकारांना लाभ मिळण्यात होत असलेल्या अडचणींचा मुद्दा आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे दाखल करून त्यांनी राज्यातील हजारो कलावंतांच्या प्रलंबित प्रश्नाला विधिमंडळात वाचा फोडत शासनाचे लक्ष वेधले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केलेल्या तारांकित प्रश्नात म्हंटले कि, मुंबई, जालना, लातूर, परभणी आणि बुलढाणा जिल्ह्यांतील विविध क्षेत्रातील अनेक वृद्ध कलावंतांचे दरमहा मिळणारे पाच हजार रुपयांचे मानधन आधार कार्ड



पडताळणी (केवायसी) न झाल्यामुळे प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आल्याचे त्यांनी प्रश्नातून नमूद केले. संगीत, नाटक, लोककला, चित्रकला, शिल्पकला आणि नृत्य क्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कलाकारांसाठी शासनाची मासिक अर्थसहाय्य योजना कार्यान्वित असून, वर्षभरात सुमारे ३४ हजार पात्र कलाकारांना दरमहा पाच हजार रुपये देण्याचा शासनाचा निर्णय असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले. सन २०२४ मध्ये योजनेतील पूर्वीची 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' ही श्रेणी पद्धत रद्द करून सर्व पात्र कलाकारांना समान लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, त्यानंतर लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने जिल्हास्तरावरील अर्ज छाननी दरम्यान पात्रतेच्या निकषांबाबत विसंगती निर्माण झाली असून अनेक पात्र कलाकार लाभापासून वंचित राहत असल्याच्या तक्रारी समोर आल्याचे आमदार ठाकूर यांनी प्रश्नात नमूद केले. या पार्श्वभूमीवर शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे का, लाभार्थ्यांना वेळेत अर्थसहाय्य मिळावे, केवायसीमुळे होणारा विलंब टाळावा तसेच पात्रतेचे निकष अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे किंवा प्रस्तावित आहे, याबाबतही त्यांनी शासनाकडे स्पष्टीकरण मागितले.

राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी या प्रश्नावर दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले कि, राज्य शासनाने विविध वैयक्तिक लाभाच्या योजनांचा निधी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याचे धोरण आहे. या धोरणानुसार राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ कलावंत व साहित्यिक मानधन योजनेमधील लाभार्थ्यांना मानधन थेट अदा करण्यात येते. मुंबई, जालना, लातूर, परभणी, बुलढाणा या जिल्ह्यातील एकूण पात्र लाभार्थी ५३२३ इतके असून त्यापैकी ४६६५ इतके कलावंतांची डीबीटी अंतर्गत नोंदणी पूर्ण झालेली आहे. या कलावंतांना नियमित मानधन अदा करण्यात येते. तथापि, उर्वरित कलावंत ६५८ यांची वैयक्तिक आधार पडताळणी व बँक सिंडीग न झाल्यामुळे मानधन अदा करण्यात आले नाही. सदर वैयक्तिक आधार पडताळणी व बँक सिंडीग कालवंत यांच्याकडून झाल्यावर त्यांना मानधन देण्यात येईल. संगीत, नाटक, लोककला, चित्रकला, शिल्पकला व नृत्य क्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कलाकारांना शासनामार्फत दरमहा आर्थिक मदत देण्याची योजना कार्यान्वित असून या योजनेंतर्गत वर्षभरात सुमारे ३४ हजार कलाकारांना दरमहा रुपये पाच हजार इतके अर्थसहाय्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच सन २०२४ मध्ये योजनेतील पूर्वीची श्रेणी पद्धत (अ, ब, क, ड) रद्द करून सर्व पात्र कलाकारांना सरसकट लाभ देण्याचा निर्णय घेतल्यामुळे लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून त्यांच्या अर्जाची छाननी जिल्हास्तरावर होत असताना पात्रतेच्या निकषांबाबत विसंगती व तक्रारी प्राप्त झाल्याने अनेक पात्र कलाकार लाभापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आल्याची बाब खरी आहे. सदर विषयाच्या अनुषंगाने माझ्या अध्यक्षतेखाली दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी सर्व संबंधित जिल्हाधिकारी व संचालक, सांस्कृतिक कार्य यांच्यासमवेत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये ज्या कलावंताना तांत्रिक बाबीमुळे मानधन प्राप्त होण्यात अडचणी येतात त्या दर अडचणी सोडवणूक करुन मानधन सुरु होण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत. पात्रतेचे निकष अधिक सुलभ व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने मानधन योजना इतर बाबीचा विचार करुन योजनेमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे.

# उलवे नोडमधील अतिक्रमणांविरोधात सिडकोची धडक कारवाई

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : सिडकोच्या अनधिकृत बांधकामे नियंत्रक नवी मुंबई विभागातर्फे अनधिकृत बांधकामांविरोधात कारवाईचा सपाटा लावला आहे. त्यानुसार उलवे नोडमधील सिडको मालकीच्या भूखंडावर अनधिकृतपणे उभ्या राहिलेल्या अतिक्रमणांवर सिडकोच्या अनधिकृत बांधकामे नियंत्रक विभागाने नुकतीच धडक कारवाई करत याठिकाणच्या अतिक्रमणांवर कारवाई केली.

सिडकोच्या या कारवाई मोहिमेदरम्यान उघड्यावरील चिकन मटण विक्रीची दुकाने, आठवडा बाजारातील अनधिकृत स्टॉल, फर्निचर दुकाने, गॅरेजेस, वाहन धुलाई केंद्रे (वॉशिंग सेंटर्स), पक्के शेड, पत्राशेड, जाहिरात फलक, टपऱ्या,



नर्सरी तसेच रस्ते, पदपथ व सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली. सिडकोच्या अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) विभागामार्फत उलवे नोड येथील सेक्टर क्र. 8, 9, 17, 18 व 19 मध्ये विशेष निष्कासन मोहीम राबविण्यात आली. भर पावसातही सदर मोहीम नियोजनानुसार यशस्वीपणे पार पाडण्यात आली. या मोहिमेदरम्यान उघड्यावरील चिकन मटण विक्रीची दुकाने, आठवडा बाजारातील अनधिकृत स्टॉल, फर्निचर दुकाने, गॅरेजेस, वाहन धुलाई केंद्रे (वॉशिंग सेंटर्स), पक्के शेड, पत्राशेड, जाहिरात फलक, टपऱ्या, नर्सरी तसेच रस्ते, पदपथ व सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली. वरील अतिक्रमणे सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करून तसेच सिडको महामंडळाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता उभारण्यात आल्यामुळे त्यांच्यावर निष्कासनाची कार्यवाही करण्यात आल्याचे सिडकोने स्पष्ट केले आहे.

सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार व मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) प्रशांत भंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईची ही मोहिम राबविण्यात आली. सदर कारवाईत सिडकोच्या अनधिकृत बांधकामे विभागाचे अधिकारी अमित राजपूत, भूमापक वैभव काळे, स्थानिक पोलीस अधिकारी व सिडको पोलीस पथक, महावितरण विभागाचे अधिकारी, सिडको सुरक्षा रक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक यांनी सहभाग घेतला. या कारवाईसाठी प्रत्येकी एक जेसीबी, ट्रक, 2 जीप व 10 कामगार यांचा वापर करण्यात आला. दरम्यान, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील सुरक्षितता अबाधित ठेवण्यासाठी तसेच सिडकोच्या मालकीच्या जागांवरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी यापुढेही अशा स्वरूपाच्या विशेष निष्कासन मोहिमा नियमित व सातत्याने राबविण्यात येणार असल्याचा इशारा सिडकोतर्फे देण्यात आला आहे.

# नवीन पनवेल मध्ये वारंवार होत असलेल्या खंडीत वीजपुरवठया मुळे नागरीक त्रस्त

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : नवीन पनवेल सेक्टर 6 मध्ये गेले काही दिवस वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरीक त्रस्त झाले आहेत त्यामुळे परिसरात जेष्ठ नागरिकांचे व लहान मुंलाचे आरोग्य धोक्यात आले आहे या परिसरात नागरीकरण आता मोठ्या प्रमाणात वाढला आहे त्यामुळे वीजेची मागणी वाढलेली आहे वीज अपुरी पडत असल्याने एम सी बी वारंवार परिसरात वीज खंडित करत असल्याचा आरोप नगरसेवक प्रकाश म्हात्रे यांनी केला आहे तसेच परिसरातील केबल जुन्या झाल्या आहेत मिनी ट्रान्सप्लांट अनेक वेळा नादुरुस्त होतों त्यामुळे वीजपुरवठा खंडित होत आहे सदर प्रकारात ताबडतोब दुरूस्ती करावी अशी मागणी



नगरसेवक प्रकाश म्हात्रे यांनी एम सी बी च्या कार्यकारी अभियंता यांच्या कडे एका पत्राद्वारे केली आहे

# वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांची पहिलीच धडाकेबाज कारवाई

## जवळपास 9 लाख रुपये किंमतीचा 18 किलो गांजा केला हस्तगत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल,प्रतिनिधी :** पनवेल शहर पोलीस ठाण्याचा कार्यभार स्वीकारताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी अंमली पदार्थांविरोधात धडाकेबाज कारवाई करत तब्बल 18 किलो गांजा जप्त केला आहे. या कारवाईत सुमारे 9 लाख 22 हजार 80 रुपये किमतीचा गांजा जप्त करण्यात आला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात एक इसम गांजाची विक्री करण्यासाठी येणार आहे. या माहितीची शहानिशा करून बाळा कुंभार यांनी पोलीस उपनिरीक्षक देवकते व त्यांच्या पथकाला तात्काळ कारवाईचे आदेश दिले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि देवकते आणि त्यांच्या पथकाने परिसरात सापळा रचला. संशयित इसम घटनास्थळी येताच त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याकडून विक्रीसाठी आणलेला गांजा आढळून आला. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण



करून आरोपीविरुद्ध अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत 18 किलो गांजा जप्त करण्यात आला असून त्याची अंदाजे किंमत 9 लाख 22 हजार 80 रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. सदर कारवाईमध्ये पोलीस उपनिरीक्षक देवकते यांच्यासह पोलीस हवालदार बोरसे, पोलीस शिपाई दत्ता जाधव, मोकळ, कराड व इतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या कारवाईमुळे अंमली पदार्थ विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून पोलीस दलाच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मान्सूनमध्ये डेंग्यू–मलेरियाविरोधात विशेष आरोग्य उपक्रम; २४x७ मोफत ऑनलाईन ओपीडी सेवा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी)** : पावसाळा सुरू होत असताना डेंग्यू, मलेरिया, ताप आणि इतर संसर्गजन्य आजारांमध्ये नेहमीप्रमाणे वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन भारतातील आघाडीच्या स्वतंत्र आरोग्य विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने मुंबई महानगर प्रदेशात आपला मान्सून आरोग्यसेवा पोहोच उपक्रम अधिक व्यापक केला आहे. “स्टार हेल्थच्या आर्थिक वर्ष २५-२६ नुसार रायगड आणि मुंबई आकडेवारीनुसार ताप व संसर्गजन्य आजारांसाठी होम हेल्थकेअर वापरात तिपटीने वाढ झाली आहे.

या उपक्रमाबाबत भाष्य करताना स्टार हेल्थ इन्शुरन्सच्या मुंबई ऑनलाईन आणि गोवा विभागाचे व्यवसाय प्रमुख धीरज गोयल म्हणाले की, “रायगडतील मान्सूनमध्ये ताप, डेंग्यू, मलेरिया आणि संसर्गजन्य आजारांमध्ये वाढ होणे अपेक्षितच असते, मात्र अनेक कुटुंबे सुरुवातीची लक्षणे दिसूनही वेळेवर वैद्यकीय सल्ला घेत नाहीत आणि आजार गंभीर झाल्यानंतरच उपचारासाठी रुग्णालयात पोहोचतात. यंदाच्या पावसाळ्यात ही परिस्थिती बदलण्यासाठी आजाराच्या सुरुवातीच्या टप्प्यातच नागरिकांना सहज, सुलभ आणि वेळेवर आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे, हीच आमची प्रमुख भूमिका आहे. कंपनीने अलीकडेच सुरू केलेल्या ऑनलाईन ओपीडी सेवेला देशभरातून उल्लेखनीय प्रतिसाद मिळत असूनवाढत्या संख्येने ग्राहक पहिल्या वैद्यकीय सल्ल्यासाठी ही सेवा निवडत आहेत. पॉलिसीधारकांनाटॉक टू स्टारआणि होम

## रायगड आणि मुंबईच्या आकडेवारीनुसार ताप व संसर्गजन्य आजारांसाठी होम हेल्थकेअर वापरात तिपटीने वाढ

हेल्थकेअर सहाय्याशी जोडणे, तसेच सर्वसामान्य नागरिकांनास्टार हेल्थ कस्टमर ॲपद्वारे मोफत २४/७ ऑनलाईन ओपीडी सल्लामसलत सेवा उपलब्ध करून देत या आरोग्यसेवा पोहोच उपक्रमाचा भर लवकर निदान आणि उपचार मिळण्यावरआहे. पॉलिसीधारकांसाठी ७६७६९०५९०५ या क्रमांकावरील टॉक टू स्टार सेवा मार्गदर्शित प्रवेश केंद्र म्हणून उपलब्ध आहे.

नॅशनल स्टॅटिस्टिकल ऑफिसच्या घरगुती आरोग्य खर्चावरील ८० व्या फेरीतील सर्वेक्षणाच्या २०२६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसारआजारपण आणि रुग्णालयात दाखल होण्यामुळे कुटुंबांवर मोठा आर्थिक भार पडतो असे ठळकपणे नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात खाजगी रुग्णालयात दाखल होण्याचा सरासरी खर्च ४४५८० रुपये असून शहरी भागात तो ६७८३१ रुपये इतका आहे. यातील जवळपास ९० टक्के खर्च व्यक्ती आणि कुटुंबांना स्वतःच्या खिशातून करावा लागतो. स्टार हेल्थच्या मान्सून सहाय्य प्रोटोकॉलद्वारे ही दरी भरून काढण्यासाठी दोन स्पष्ट मार्ग उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पॉलिसीधारकांसाठीटॉक टू स्टार आणि सर्वसाधारण नागरिकांसाठीस्टार हेल्थ कस्टमरॲपद्वारे मोफतऑनलाईन ओपीडी या सेवांमुळे लक्षणे गंभीर होण्यापूर्वी किंवा रुग्णालयात जाण्याची गरज निर्माण होण्यापूर्वीच कुटुंबांना वैद्यकीय सल्ला घेण्याचा अधिक सोपा आणि सुलभ पर्याय मिळतो.

# जनतेची वाहने प्रयोगशाळा नाहीत!

सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान केंद्र सरकारच्या वतीने करण्यात आलेल्या "20 टक्के इथेनॉल मिश्रित इंधन कार्यक्रम अजूनही प्रयोगाच्या टप्प्यात आहे" या विधानाने देशभरातील लाखो वाहनधारकांच्या मनात अस्वस्थता निर्माण केली आहे. त्यानंतर सरकारने स्पष्टीकरण दिले असले, तरी मूळ प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत.

देशातील सामान्य नागरिकाने वाहन हे चैनीसाठी नव्हे, तर रोजीरोटी, व्यवसाय आणि कुटुंबाच्या गरजांसाठी घेतले आहे. अनेकांनी कर्ज काढून, आयुष्यभराची बचत खर्च करून दोनचाकी किंवा चारचाकी विकत घेतली आहे. अशा नागरिकांच्या वाहनांवर कोणतेही धोरण राबवताना सरकारने संपूर्ण




वैज्ञानिक चाचण्या, पारदर्शक माहिती आणि स्पष्ट हमी दिली पाहिजे.

सरकारला थेट प्रश्न आहे— जर हा कार्यक्रम पूर्णपणे सिद्ध झाला असेल, तर सर्वोच्च न्यायालयात "प्रयोग" असा उल्लेख का झाला? आणि जर तो खरोखरच मूल्यमापनाच्या टप्प्यात असेल, तर त्या प्रयोगाचा संभाव्य धोका कोण स्वीकारणार? वाहनांचे इंजिन बिघडले, देखभाल खर्च वाढला किंवा भविष्यात नुकसान झाले, तर त्याची जबाबदारी कोणाची?

देशाच्या विकासासाठी पर्यायी इंधनाचा शोध महत्त्वाचा आहे. पर्यावरणाचे संरक्षणही आवश्यक आहे. मात्र, विकासाच्या नावाखाली सामान्य नागरिकांच्या कष्टाच्या पैशावर उभ्या असलेल्या वाहनांना अनिश्चिततेच्या भोवऱ्यात ढकलणे योग्य ठरणार नाही.

सरकारने जनतेच्या मनातील सर्व शंका दूर करण्यासाठी संपूर्ण अभ्यास, चाचण्यांचे निष्कर्ष आणि तज्ज्ञांचे मत खुलेपणाने जाहीर करावे. लोकशाहीत प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही; उलट तो उत्तरदायित्वाची आठवण करून देणारा लोकशाहीचा मूलभूत अधिकार आहे.

देशातील नागरिक प्रयोगासाठी नाहीत. त्यांच्या कष्टाच्या कमाईतून घेतलेली वाहने प्रयोगशाळेतील नमुने नाहीत. सरकारने विश्वास हवा असेल, तर पारदर्शकता दाखवावी आणि प्रत्येक प्रश्नाला स्पष्ट उत्तर द्यावे.

# पनवेल तालुक्यातील नैना प्रभावित भागातील रखडलेल्या पुनर्विकासाचा प्रश्न विधान परिषदेत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : पनवेल तालुक्यातील नैना प्रभावित क्षेत्रातील हजारो जुन्या गृहनिर्माण सोसायट्यांचा पुनर्विकास गेल्या अनेक वर्षांपासून रखडल्याचा गंभीर मुद्दा विधान परिषदेत उपस्थित करण्यात आला. आमदार विक्रांत पाटील यांनी हा प्रश्न सभागृहात मांडत नैना क्षेत्रातील जुन्या व धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी हा परिसर तातडीने 'कंजस्टेड एरिया' म्हणून घोषित करावा आणि यूडीसीपीआर (UDCPR) मधील पुनर्विकासासंदर्भातील तरतुदी लागू करण्याची मागणी शासनाकडे केली.

आमदार विक्रांत पाटील यांनी सांगितले की, पनवेल व नैना प्रभावित परिसरात अनेक गृहनिर्माण सोसायट्या जुन्या झाल्या असून त्यांचा पुनर्विकास अपुऱ्या एफएसआय मुळे पूर्णपणे ठप्प झाला आहे. विकासकांना प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरत



नसल्याने पुनर्विकासाची कामे पुढे सरकत नाहीत. परिणामी हजारो कुटुंबे आजही जीर्ण व धोकादायक इमारतींमध्ये राहण्यास मजबूर आहेत.

याचबरोबर कमी एफएसआयमुळे अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकामे आणि अनियोजित विकासाला खतपाणी मिळत असल्याची गंभीर बाबही त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाल्यास सुरक्षित घरे, आधुनिक पायाभूत सुविधा आणि नियोजित शहरी विकासाला गती मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले. नैना प्रभावित भागाला कंजस्टेड एरियाचा दर्जा देऊन यूडीसीपीआर मधील सवलती लागू केल्यास हजारो गृहनिर्माण सोसायट्यांच्या पुनर्विकासाचा मार्ग सुकर होईल. त्यामुळे नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार घरे मिळण्याबरोबरच अनधिकृत विकासालाही आळा बसेल, असे आमदार विक्रांत पाटील यांनी नमूद केले.

या प्रश्नावर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन नैना प्रभावित भागातील रखडलेला पुनर्विकास मार्गी लावावा, अशी जोरदार मागणी त्यांनी विधान परिषदेत केली. त्यांच्या या मागणीमुळे नैना परिसरातील हजारो नागरिकांच्या पुनर्विकासाच्या अपेक्षांना पुन्हा एकदा बळ मिळाले आहे.

# स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकन पक्षाच्या वतीने पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांची आज सदिच्छा भेट घेऊन त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे, पनवेल विधानसभा अध्यक्ष निलेश कांबळे आणि पनवेल शहर अध्यक्ष प्रशांत सोनावणे उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या सदिच्छा



भेटीदरम्यान विविध सामाजिक व जनहिताच्या विषयांवरही सकारात्मक चर्चा करण्यात आली. पक्षाच्या वतीने पोलीस प्रशासनाच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करत भविष्यातही सहकार्याची भूमिका कायम ठेवण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# पोलीस मित्र मानवाधिकार संघटना महाराष्ट्र अध्यक्ष राजहंस वाढे यांना साई प्रेरणा गौरव पुरस्कार सिने अभिनेत्री अलका कुबल मॅडम यांच्या हस्ते पुरस्कार सन्मानित करण्यात आला

**दैनिक युवक आधार**

**कल्याण/रशीद शेख :** ओम साई प्रतिष्ठान व बीबीसी फिल्म प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने शिर्डी येथे भव्य पुरस्कार सोहळा बीबीसी फिल्म प्रोडक्शन ची निर्माते माननीय संसारे सर व सुपरस्टार सिने अभिनेत्री मा.अलका कुबल मॅडम यांनी महाराष्ट्र राज्यामधून समाजाच्या हितासाठी अहो रात्र न्याय देण्याचं काम सामाजिक कार्य बघून महाराष्ट्र राज्यांमधून पोलीस मित्र मानवाधिकार संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष



मा.राजहंस वाढे यांना शिर्डी येथे साई प्रेरणा गौरव पुरस्कार सन्मानित करण्यात आला आहे.. महाराष्ट्र राज्यांमधून अनेक संघटनेचे पदाधिकारी यांनी राजहंस वाढे सर यांना शुभकामना देण्यात येत आहे तसेच त्यांना सामाजिक कार्यासाठी पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा

# आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत 'सीकेटी'चा दबदबा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित पहिल्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाने उल्लेखनीय यश मिळवत मुंबई विभागात अव्वल स्थान पटकावले आहे. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने सादर केलेल्या 'कीचकवध पुन्हा' या एकांकिकेला प्रथम क्रमांकाचा मान मिळाल्याने संस्थेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या एकांकिकेने केवळ सांघिक प्रथम क्रमांकच मिळवला नाही, तर विविध वैयक्तिक विभागांतही सीकेटीच्या विद्यार्थ्यांनी आपले वर्चस्व सिद्ध केले. प्रणव शेडगे यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचा प्रथम पुरस्कार मिळाला, तर अखिलेश, सुशांत, पीयूष आणि भूमी यांच्या संगीत संयोजनाला सर्वोत्कृष्ट संगीताचा प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. अनामिका कांबळे यांनी सर्वोत्कृष्ट वेशभूषा, तर दिक्षिता पाटील यांनी सर्वोत्कृष्ट रंगभूषेचा प्रथम पुरस्कार पटकावला. या सर्व विजेत्यांचा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार





यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

याचबरोबर, ६४व्या हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेच्या ठाणे विभागीय प्राथमिक फेरीत पनवेलच्या कलाकारांनीही आपल्या अभिनय आणि तांत्रिक कौशल्याची प्रभावी छाप पाडली. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे सादर करण्यात आलेल्या 'नारायणी' या दोन अंकी नाटकाला विविध विभागांत मानाची पारितोषिके मिळाली. अभिनय विभागात सानिका पाटील यांनी सर्वोत्कृष्ट स्त्री भूमिका, तर क्षितिज गायकवाड यांनी सर्वोत्कृष्ट पुरुष भूमिकेचा पुरस्कार पटकावला. तांत्रिक विभागात श्याम चव्हाण यांना सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजनेसाठी प्रथम क्रमांक, रितूपर्ण कीर्तोनिया यांना सर्वोत्कृष्ट रंगभूषा आणि वेशभूषेसाठी द्वितीय क्रमांक, गणेश जगताप यांना सर्वोत्कृष्ट संगीतासाठी द्वितीय क्रमांक, तर रितूपर्ण कीर्तोनिया, रोहित देशमुख आणि आर्यन अन्सारी यांना सर्वोत्कृष्ट नेपथ्यासाठी तृतीय

**■ 'कीचकवध पुन्हा' मुंबई विभागात प्रथम**
**■ राज्य नाट्य स्पर्धेतही पनवेलच्या कलाकारांची चमक**
**■ मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते गौरव**
**■ लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून विजेत्यांचे अभिनंदन**

क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. एकांकिका आणि राज्य नाट्य स्पर्धा अशा दोन्ही प्रतिष्ठेच्या व्यासपीठांवर पनवेलच्या विद्यार्थ्यांनी आणि कलाकारांनी मिळवलेल्या या दैदिप्यमान यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व विजेते कलाकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ आणि मार्गदर्शकांचे अभिनंदन करत त्यांच्या भावी कलाप्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. या यशामुळे पनवेलच्या सांस्कृतिक परंपरेला आणखी बळ मिळाले आहे.

# दैनिक युवक आधारचा इम्पॅक्ट

## राज्य मार्ग क्रमांक ७ वरील रस्त्याचे काम शासकीय मानांकनानुसारच होणार

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी :** राज्य मार्ग क्रमांक ७ अंतर्गत भरवस फाटा–कोळपेवाडी–देर्डे फाटा रस्त्याच्या नूतनीकरणाच्या कामात सातमोऱ्या ते भरवस फाटा या टप्प्यावर निकृष्ट दर्जाचे व नियमबाह्य काम होत असल्याचा मुद्दा दैनिक युवक आधारने वृत्ताच्या माध्यमातून उचलून धरला होता. या वृत्ताची दखल घेत संबंधित यंत्रणा आणि ठेकेदारांनी कामाबाबत खुलासा करत रस्त्याचे काम शासकीय मानांकनानुसारच करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.


दैनिक Epaper.YuvakAadhar.In युवक आधार मुख्यसंपादक : भारती संतोष आमले - 9220403509 Page 7 03 Jul 2026

२३२ कोटींच्या रस्त्यावर ठेकेदाराची मनमानी; 'पुढारी सुस्त, जनता त्रस्त'

अधिकाऱ्यांच्या आदेशालाही ठेंगा; खोदकामाविना निकृष्ट खडी टाकून रातोरात काम उरकण्याचा आरोप

दैनिक युवक आधार

राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी : राज्य मार्ग क्रमांक ७ अंतर्गत सुरू असलेल्या भरवस फाटा–कोळपेवाडी–देर्डे फाटा या तब्बल २३२ कोटी रुपयांच्या रस्ते प्रकल्पात गंभीर अनियमितता उघडकीस आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. सातमोऱ्या ते भरवस फाटा या टप्प्यावर आवश्यक खोदकाम न करताच निकृष्ट दर्जाची खडी टाकून रस्त्याचे काम सुरू असल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. विशेष म्हणजे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी कामातील त्रुटी निदर्शनास [illegible] स्पष्ट सूचना दिल्यानंतरही ठेकेदाराने [illegible] धाब्यावर [illegible] रात्रीच पुन्हा निकृष्ट खडी पसरवल्याचा आरोप होत आहे.

देर्डे [illegible]ट्याकडून सातमोऱ्यापर्यंत [illegible] कोपरगा[illegible] हद्दीत जुना रस्ता पूर्णपणे खोदून नवीन माती व मुरूम टाकत भक्कम पाया तयार करण्यात आला. मात्र, निफाड हद्दीतील सातमोऱ्या ते भरवस फाटा या भागात खोदकामालाच फाटा देत थेट खडी टाकण्यात आली. वापरण्यात आलेल्या खडीत मोठ्या प्रमाणात दगडाचा चुरा असल्याने कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नागरिकांच्या तक्रारीनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता तुळशीराम दहिफळे यांनी घटनास्थळी पाहणी करून नियमानुसार संपूर्ण खोदकाम करून भक्कम पाया तयार करण्याचे तसेच निकृष्ट खडीऐवजी दर्जेदार खडी वापरण्याचे स्पष्ट आदेश दिले. मात्र, या आदेशांकडे दुर्लक्ष करत ठेकेदाराने रात्रीच पुन्हा काम सुरू केल्याने अधिकाऱ्यांच्या आदेशालाही उघडपणे आव्हान दिले जात असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

दरम्यान, सातमोऱ्या ते देवगाव फाटा हा रस्ता गेल्या दोन-तीन महिन्यांपासून खोदलेल्या अवस्थेत असल्याने नागरिक धुळीने हैराण झाले आहेत. पावसाळ्यात चिखलामुळे वाहनधारकांची मोठी गैरसोय होत आहे. तरीही कामाचा दर्जा सुधारण्याऐवजी घाईघाईने काम पूर्ण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

'पुढारी सुस्त, जनता त्रस्त'

रस्त्याच्या कामाबाबत वारंवार तक्रारी होऊनही निफाड तालुक्यातील लोकप्रतिनिधी या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे "पुढारी सुस्त, ठेकेदार मस्त आणि जनता त्रस्त" अशी संतप्त प्रतिक्रिया परिसरातून उमटत आहे.

निकृष्ट कामाची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करावी, अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

IMPACT

या प्रकल्पासाठी सुमारे २३२ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून भरवस फाटा ते सातमोऱ्या हा सुमारे ९ किलोमीटरचा टप्पा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विकसित केला जात आहे. नागरिकांनी सातमोऱ्या ते भरवस फाटा या भागात रस्ता न खोदताच खडी टाकून काम सुरू असल्याची तक्रार केली होती. त्यानंतर हा विषय दैनिक युवक आधारने प्रसिद्ध केला.

याबाबत एन.पी. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि.चे प्रकल्प व्यवस्थापक श्याम निकम यांनी सांगितले की, सध्या सुरू असलेले खडीकरण हे केवळ पावसाळ्यात वाहतूक सुरळीत राहावी आणि पाण्याचा निचरा व्हावा यासाठी तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आले आहे. पावसाळा संपल्यानंतर संपूर्ण रस्ता नियमानुसार खोदून नवीन मुरूम टाकत भक्कम पाया तयार करण्यात येईल. त्यानंतर मंजूर आराखडा, तांत्रिक मानके आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सूचनांनुसार काँक्रीट रस्त्याचे काम पूर्ण केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.दैनिक युवक आधारने उपस्थित केलेल्या जनहिताच्या प्रश्नाची दखल घेत संबंधित यंत्रणेकडून काम शासकीय मानकांनुसार होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# विष्णुनगर (ता. निफाड) येथे हरित गाव घडवण्याचा सामूहिक संकल्प

## भव्य वृक्षारोपण सोहळ्याची जोरदार तयारी

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी :** येथे पर्यावरण संवर्धन आणि हरित भविष्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून ग्रामस्थांनी एकत्र येत "हरित गाव घडवण्याचा सामूहिक संकल्प" केला आहे. या संकल्पामुळे गावात वृक्षारोपण चळवळीला नवी ऊर्जा मिळाली असून संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि भावनिक वातावरण निर्माण झाले आहे.

रविवार, १२ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता भव्य वृक्षारोपण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा उद्देश केवळ झाडे लावणे नसून पुढील पिढ्यांसाठी शुद्ध हवा, सावली, फळे आणि सुरक्षित जीवनाची पायाभरणी करणे हा आहे. "आज लावलेले प्रत्येक रोपटे उद्याच्या जीवनाचा आधार ठरणार आहे," या जाणिवेतून ग्रामस्थ मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी होत आहेत.

या उपक्रमाची संकल्पना श्री. रामकृष्ण मोतीराम घायाळ सर यांनी मांडली असून ग्रामस्थ, युवक, महिला आणि विविध सामाजिक घटकांच्या सहभागातून हा सोहळा भव्य स्वरूपात पार पडणार आहे. झाडे लावणे ही केवळ औपचारिकता नसून




निसर्गाशी असलेले नाते अधिक दृढ करण्याचा एक सामूहिक प्रयत्न आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. भास्कर भगरे सर (दिंडोरी लोकसभा, खासदार) तर प्रमुख अतिथी म्हणून मा. गोकुळ गीते (महाराष्ट्र विधान परिषद, आमदार) उपस्थित राहणार आहेत. तसेच शशिकांत मंगरुळे (निफाड, प्रांत अधिकारी), विशाल नाईकवाडे (निफाड, तहसीलदार), नम्रता जगताप (निफाड, गटविकास अधिकारी), सागर कोते (लासलगाव, सहाय्यक पोलीस निरीक्षक),

> **"एक रोपटं एक श्वास आणि हरित उद्याची सुरुवात" या भावनिक संदेशातून ग्रामस्थांनी सर्व नागरिकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे**

नितीन लालसरे (महाराष्ट्र, उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी), राजेश थोरात (निफाड, विस्ताराधिकारी), सुनील शिंदे (निफाड, ग्रामविकास अधिकारी), विजय गरुड (निफाड ग्रामविकास अधिकारी ) तसेच निफाड पंचायत समिती येथील माजी सभापती व माजी सदस्य, लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, पोलीस विभाग, पंचायत राज विभाग, कृषी विभागातील अधिकारी आणि परिसरातील विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.तसेच परिसरातील पोलीस पाटील, परिसरातील ग्रामपंचायत येथील माजी सरपंच, माजी उपसरपंच व माजी सदस्य, विंचूर कार्यकारी सोसायटीचे चेअरमन, व्हा. चेअरमन व सदस्य, तसेच पत्रकार बांधव यांनीही या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विष्णुनगर ग्रामस्थांनी केले आहे.

# दोन किलोमीटर धावत पाठलाग; लासलगाव पोलिसांनी फरार आरोपीला जेरबंद!

**विद्यानगर चोरी प्रकरणातील मुख्य संशयित अटकेत; येवला येथील चार गंभीर गुन्ह्यांचा तपासही वेगात**

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी :** विद्यानगर येथील चोरी प्रकरणातील मुख्य संशयित आरोपीने पोलिसांना पाहताच पळ काढला; मात्र लासलगाव पोलिसांनी तब्बल दोन किलोमीटर धावत पाठलाग करून त्याला शिताफीने जेरबंद केले. या धाडसी कारवाईमुळे फरार आरोपी अखेर पोलिसांच्या ताब्यात आला असून, येवला येथील अन्य चार गंभीर गुन्ह्यांच्या तपासालाही गती मिळणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३१ मार्च २०२६ रोजी लासलगाव येथील विद्यानगर परिसरात चोरीची घटना घडली होती. याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ९६/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३३१(४) व ३०५(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील करीत आहेत.

या प्रकरणातील एक



आरोपी यापूर्वीच पोलिसांच्या ताब्यात असून, त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार त्याचा साथीदार भाऊराव रघुनाथ पवार (रा. सावरगाव, ता. येवला) हा गुन्हा घडल्यापासून फरार होता. तसेच येवला शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या आणखी चार गंभीर गुन्ह्यांमध्येही तो पोलिसांना हवा होता.

सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांना आरोपीच्या हालचालींबाबत गोपनीय माहिती मिळताच विशेष पथक तयार करण्यात आले. पथक सावरगाव येथे पोहोचताच आरोपीने पोलिसांना पाहून पळ काढला. मात्र पोलिसांनी हार न मानता तब्बल दोन किलोमीटर धावत त्याचा पाठलाग केला आणि अखेर घेराव घालून त्याला अटक केली.

अटक करण्यात आलेल्या आरोपीला न्यायालयात हजर करण्यात येणार असून, या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक मोहन पाटील, पोलीस अंमलदार अविनाश सांगळे, संदीप डबळे तसेच चालक पोलीस अंमलदार चंदू मांजरे यांनी सहभाग घेतला. सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या धाडसी आणि यशस्वी कारवाईबद्दल लासलगाव पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# खासदार बळवंतभाऊ वानखडे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी :** दि.२ जुलै दर्यापूर खासदार बळवंतभाऊ वानखडे यांच्या वाढदिवसानिमित्त दर्यापूर येथील जनसंपर्क कार्यालय व कृषी भवन येथे अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास संपूर्ण मतदारसंघातून नागरिक, हितचिंतक, मित्रपरिवार, काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खासदार वानखडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. खासदार वानखडे यांनी उपस्थितांच्या शुभेच्छांचा मनःपूर्वक स्वीकार केला.

वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व सायकलींचे वाटप तसेच गूळ तुळा अशा विविध समाजोपयोगी उपक्रमांचा समावेश होता. या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

मतदारसंघातील विविध भागांतून आलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने










उपस्थित राहून खासदार बळवंत वानखडे यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी अनेक मान्यवर, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही त्यांना शुभेच्छा देत पुढील सामाजिक व विकासात्मक कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप पांडेकर यांनी केले.या कार्यक्रमाला मा. श्रीरंग पाटील अरबट, दिनकररावजी गायगोले, बाळासाहेब टोळे, सुनीलभाऊ गावंडे (सभापती, कृ.उ.बा.स. दर्यापूर), अतितभाऊ शिरभाते, पप्पू होले (शहराध्यक्ष काँग्रेस कमिटी, दर्यापूर), प्रदीपभाऊ देशमुख (माजी सभापती, पंचायत समिती, दर्यापूर), रामेश्वरभाऊ मालपाणी (नगरसेवक, न.प. दर्यापूर),

**रक्तदान, वृक्षारोपण, शालेय साहित्य व सायकल वाटपासह विविध सामाजिक उपक्रम; नागरिक, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती**

गजाननभाऊ देवतळे (माजी सभापती, पंचायत समिती), राजेंद्रभाऊ वडाळ (संचालक, कृ.उ.बा.स. दर्यापूर), भारतभाऊ आठवले (संचालक, कृ.उ.बा.स. दर्यापूर), डॉ. अविनाश ठाकरे, राजेंद्र नागपुरे, सय्यद राजीक, पोलेंद्र ढोके, दादाराव डांगळे, दिलीप गर्डे, इंजी. नितेश वानखडे (महासचिव, युवक काँग्रेस महाराष्ट्र), सागर देशमुख (तालुकाध्यक्ष, युवक काँग्रेस, दर्यापूर) यांच्यासह नगरसेवक, काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मान्यवर नागरिक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रकल्प अधिकारी नितीन ईसोकर यांची यशस्वी वाटचाल

**दैनिक युवक आधार**

**वाडी प्रतिनिधी राकेश यादव** : नागपूर प्रकल्प कार्यालय येथे दिनांक 12/7/ 23 पासून कार्यरत प्रकल्प अधिकारी श्री नितीन इसो कर त्यांची बदली देवरी प्रकल्प कार्यालय येथे झाली. प्रकल्प अधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांनी पारधी समाजासाठी मोठ्या प्रमाणात योजना राबवल्या छोटा पाड्यावर जाऊन पारधी समाजातील होतकरू तरुणांना सोबत घेऊन तेथे प्रत्यक्षात पाहणी करून त्यांच्या समस्या सोडवण्याचे दृष्टीने मोलाचे कार्य केले. आदिवासी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना सुख, सुविधा पुरण्याकरिता व तेथील विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्याकरता ते नेहमी अग्रेसित होते. वस्तीगृहामध्ये नवीन वाचनालय, क्रीडा साहित्य व इतर सुविधा त्यांचे कार्यकाळात पुरविण्यात आल्या. कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक लाभार्थी यांची समस्या समजून तिचं निराकरण करण्यात त्यांचा विशेष भर होता. आदिवासी समाजासाठी प्रत्येक घटका सोबत त्यांनी काम केलं अनेक योजना यशस्वी पणे राबविल्या. शासकीय आश्रम शाळा येथे बाला लर्निंग,डिजिटल लॅब



सुसज्ज वाचनालय विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून क्रीडा साहित्य इत्यादी बाबींवर त्यांनी विशेष लक्ष दिले. कामकाज करताना कर्मचाऱ्यांवर ताण येऊ नये म्हणून त्यांनी कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजनाची सुरुवात केली. कर्मचाऱ्यांसाठी पतपेढी असावी म्हणून त्यांनी विशेष प्रयत्न करूनते मार्गी लावले . अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी प्रशिक्षणाचे वेळोवेळी आयोजन केले. तसेच दरवर्षी महिला दिनाचे औचित्य साधून सहलीचे आयोजन करून त्यांचा सत्कार करणे इत्यादी उपक्रम त्यांनी यशस्वीरीत्या राबवले.

त्यांची नागपूर वरून झालेल्या स्थानांतरण निमित्त अधिकारी व कर्मचारी तसेच आदिवासी नेते सर्वांनी आपल्या भावना व्यक्त करताना असेच लोकाभिमुख प्रशासन राबविणारे अधिकारी यापुढेही या कार्यालयास लाभावेत असा आशावाद व्यक्त करून त्यांच्या कारकीर्दीत महत्त्वाची कामे मार्गी लागले याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच श्री नितीन ईसोकर प्रकल्प अधिकारी यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

# उरण तालुक्याला मुसळधार पावसाने झोडपले ; चिरनेरमध्ये पूर सदृश्य परिस्थिती

## घरांना शिरले पुराचे पाणी, जीवनवश्यक वस्तूंचेमोठया प्रमाणात नुकसान

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : 3 जूनच्या रात्री पासून ते 4 जून दुपार पर्यंत कोसळत असलेल्या मुसळधार पावसाच्या पाण्यामुळे उरण तालुक्याला अक्षरशः झोडपून काढले आहे. चिरनेर गावात दोन वर्षानंतर डोंगराच्या वेगाने येणाऱ्या पाण्यामुळे पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. पुन्हा एकदा पुराच्या पाण्याचा जोरदार फटका बसला असून, शेकडो नागरिकांच्या घरात पुराचे पाणी घुसून जिवनावश्यक वस्तूंचे अतोनात नुकसान झाले आहे. संसार उपयोगी सामानाबरोबर चीज वस्तूंचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, येथील नागरिक भयभीत झाले आहेत. चिरनेर विविध गोदामांसह उभारण्यात आलेल्या अन्य गोदामांच्या भरावामुळे आणि बांधकामामुळे व नव्याने सुरू असलेल्या मातीच्या भरावांच्या



कामांमुळे पावसाचे पाणी जाण्याचे नैसर्गिक मार्ग बंद झाले आहेत.

त्यामुळे पुन्हा एकदा चिरनेर गावावर पुराचे संकट ओढावले आहे. येथील पाणी निचरा होण्याचे नैसर्गिक मार्ग बंद झाल्यामुळे शेतीजमिनी पाण्याखाली आल्या आहेत. शेतकऱ्यांनी आताच टाकलेले भाताचे बियाणे गेले चार दिवस पुराच्या पाण्यात बुडून गेले आहे. नवीन मातीचे भराव आणि गोदामामुळे पाण्याचा निचरा होण्यास मोठा अडथळा येत आहे. शनिवारी सकाळपासून जोर धरलेल्या पावसात चिरनेर गावातील अनेक नागरिकांच्या घरात पाणी घुसून, मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे.

वाऱ्यासह शुक्रवारी रात्री पासून मुसळधार कोसळणाऱ्या पावसाने सर्वांचीच झोपच उडाली. संपूर्ण चिरनेर गावातील नागरिक, महिला भयभीत झाले होते. दरम्यान कळंबुसरे, मोठीजुई, विंधणे, दिघोडे, वेश्वी पाले आदी गावांनाही पुराचा फटका बसला आहे. तर चिरनेर मधिल मुख्यत्वे कातळपाडा, मधीलपाडा, रांजणपाडा चिंचपाडा, मुळपाडा, येथे रहिवाशांच्या घरात पाणी शिरून मोठे नुकसान झाले आहे. कातळपाडा हद्दीत येणारी माथेरान ही नवीन वसाहत देखील जलमय होऊन, येथील रहिवाशांच्या घरात पाणी शिरून घरांची तळी झाली आहेत.

तीन वर्षापूर्वीही चिरनेर गावात पुराचे पाणी शिरून अनेकांच्या घरांना पाणी शिरून मोठ्या प्रमाणात जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान झाले होते.त्यावेळी पुराच्या परिस्थितीतून नागरिकांची सुटका करण्यासाठी येथील एकही पुढारी पुढे धजावला नाही. मात्र उरण तालुका दैनिक पत्रकार संघाने तात्काळ सार्वजनिक बांधकाम खात्याचे कार्यकारी अभियंता पनवेल यांना पाणी निचारा होण्यासाठी एका निवेदनाद्वारे मागणी करून पाठपुरावा करण्यात आला होता.

त्याची सार्वजनिक बांधकाम खात्याने दखल घेत चिरनेर हायवे रोडला एक स्लॅपड्रिन आणि तीन मोऱ्या बांधण्याचे काम पूर्णत्वास नेले.

मात्र भातशेतीत उभारलेली गोदामे आणि गावातील वाढती अतिक्रमणे यामुळे कचऱ्याच्या नियोजनाचा अभाव यामुळे ही सदृश्य पूरस्थिती निर्माण झाली आहे.

# ज्येष्ठ शिक्षक लक्ष्मणराव चिकटे यांचा सेवागौरव सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : "शिक्षण हे केवळ ज्ञान देण्याचे साधन नसून, ते संस्कारांचे संवर्धन करण्याचे माध्यम आहे," हे आपल्या ३६ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीतून सिद्ध करणारे ज्येष्ठ शिक्षक लक्ष्मणराव चिकटे यांच्या सेवापूर्तीनिमित्त आयोजित सेवागौरव सोहळा नुकताच अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

भारतीय शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक पाटील यांच्या हस्ते श्री. लक्ष्मणराव चिकटे व त्यांच्या धर्मपत्नी सौ. अलका चिकटे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सपत्नीक गौरव करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात या आदर्श शिक्षकाचा सन्मान केला.

आपल्या ३६ वर्षांच्या शैक्षणिक प्रवासात चिकटे यांनी शिस्त, गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या आत्मीयतेतून एक स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी आज समाजाच्या मुख्य प्रवाहात उच्च पदांवर कार्यरत आहेत. हे यश म्हणजे त्यांनी जपलेल्या समाजाभिमुख शिक्षणाचा विजय




आहे, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

कार्यक्रमात मुख्याध्यापक एस. बी. पाटील, प्राचार्य एस. बी. माळे, एन. एल. तळेले, संजय डमाळे, शेख सर आणि व्ही. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. वक्त्यांनी चिकटे सर यांच्या साधेपणाचे आणि कर्तव्यनिष्ठेचे कौतुक करतानाच, "त्यांच्या निवृत्तीने शिक्षण क्षेत्रातील एक मार्गदर्शक दीपस्तंभ विसावला आहे," अशा भावना व्यक्त केल्या.

सत्काराला उत्तर देताना लक्ष्मणराव चिकटे यांनी आपल्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा दिला. "सहकारी शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या सहकार्यामुळेच हा प्रवास यशस्वी झाला," असे सांगत त्यांनी सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानले.

या सोहळ्यास एम. आर. तुपे, चन्नावत सर, दहीहंडे साहेब, स्वामी मॅडम, कांबळे मॅडम, पी. ए. पाटील, नेहाते मॅडम, मेटे सर, के. आर. फुके, पी. के. दौड, प्रा. अजय पाटील, पी. जी. पवार, भिवरावजी बलांडे, सन्नासे मॅडम, कदम मॅडम, प्रा. डॉ. गोपीनाथ डापके, बाजीराव डापके, रामकृष्ण चव्हाण, गणेश काकडे, कोतिक चिकटे, संजय चिकटे, स्वप्निल चिकटे, अमोल गव्हाणे यांच्यासह अनेक आप्तेष्ट, मित्रमंडळी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन देवकर सर यांनी केले, तर पी. जी. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा सोहळा उपस्थितांसाठी अत्यंत प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

# एम.बी.ए. लीग ब्रीज स्पर्धेला उत्साहात प्रारंभ तरुणांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे – देवेन दोषी

## फिंटॉन अव्वल; सह्याद्री दुसऱ्या, फ्रेनीमिस तिसऱ्या स्थानावर

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड नाशिक :** महाराष्ट्र ब्रीज असोसिएशन आणि नाशिक जिल्हा ब्रीज असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय एम.बी.ए. लीग ब्रीज स्पर्धेला शनिवारी उत्साहात प्रारंभ झाला. गोखले शिक्षण संस्थेच्या बी.वाय. के. महाविद्यालय परिसरातील गुरुदक्षिणा ऑडिटोरियममध्ये स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र ब्रीज असोसिएशनचे अध्यक्ष देवेन दोषी आणि मित्र विहार क्लबचे अध्यक्ष विनोद कपूर यांच्या हस्ते झाले.

यावेळी महाराष्ट्र ब्रीज असोसिएशनचे उपाध्यक्ष अविनाश देशमुख, सचिव हेमंत पांडे, माजी अध्यक्ष जे. के. भोसले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना देवेन दोषी म्हणाले, "ब्रीज हा बुद्धिमत्ता, तर्कशक्ती आणि निर्णयक्षमतेला चालना देणारा खेळ आहे. विशेषतः आयटी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना या खेळाचा मोठा लाभ होतो. त्यामुळे अधिकाधिक तरुणांनी या खेळात सहभागी होऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधावा."

विनोद कपूर यांनी ब्रीज खेळाच्या विकासासाठी मित्र विहार क्लब आणि नाशिक जिल्हा ब्रीज असोसिएशनचे सहकार्य कायम राहील, अशी ग्वाही दिली.

यावेळी नुकत्याच गोवा येथे झालेल्या आशियाई ब्रीज अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक पटकावणाऱ्या भारतीय संघातील अनिल पाध्ये आणि राजू तोलानी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

स्पर्धेत बाबला, स्पार्टन, अहमदाबाद, सारस, सह्याद्री, अमानोरा, आयसीजे, फिंटॉन, जाम, एसबीएस, फ्रेनीमिस, एडीबीए, बोनस, वेदान्त, मित्र विहार 'अ' आणि मित्र विहार 'ब' अशा एकूण १६ संघांनी सहभाग घेतला आहे.

उद्घाटनानंतर स्विस लीग स्पर्धेतील पहिल्या दोन फेऱ्या पार पडल्या. त्यामध्ये सह्याद्री संघाने ३२.९१ गुणांसह आघाडी घेतली होती. अहमदाबाद (३१.३२), सारस (३०.४०) आणि फिंटॉन (२७.२३) यांनीही चांगली सुरुवात केली.

मात्र तिसऱ्या व चौथ्या फेरीनंतर चित्र बदलले. इयान कॉन्सर्ससीन, सुभाष भावनानी, इवान अल्फोन्सो आणि डॉ. सुबीर रॉय यांच्या फिंटॉन संघाने उत्कृष्ट खेळ करत ६३.८३ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. ५४.९८ गुणांसह सह्याद्री संघ दुसऱ्या, तर ५०.१३ गुणांसह फ्रेनीमिस संघ तिसऱ्या स्थानावर पोहोचला. अहमदाबाद संघाला ४७.५९ गुणांसह चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले.

स्विस लीगचे आणखी दोन राऊंड रविवारी होणार असून त्यानंतर अव्वल चार संघ सुपर लीगसाठी पात्र ठरणार आहेत. त्याचबरोबर मॅच पॉइंट पेअर्स प्रकारातील जोड्यांच्या स्पर्धाही आयोजित करण्यात आल्या आहेत.

स्पर्धेचे मुख्य स्पर्धा संचालक म्हणून भालचंद्र दक्षिणदास, तर विश्वनाथ बेडिया आणि चेतन रावल सहकारी म्हणून काम पाहत आहेत.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महाराष्ट्र ब्रीज असोसिएशनचे सचिव हेमंत पांडे, मित्र विहार क्लबचे अध्यक्ष विनोद कपूर, नाशिक जिल्हा ब्रीज असोसिएशनचे सचिव डॉ. अतुल दशपुते आणि सूर्या रेड्डी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महाडीबीटी ठप्प; शेतकरी 'शासकीय चक्रव्यूहात'

## विजय म्हस्के पाटील यांची कृषि मंत्र्यांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : मृग नक्षत्राची पेरणी अंतिम टप्प्यात असताना 'महाडीबीटी' पोर्टलवरील पूर्वसंमती मिळण्यास होत असलेल्या विलंबामुळे जिल्ह्यातील शेतकरी शासकीय चक्रव्यूहात अडकले आहेत. या गंभीर प्रशासकीय त्रुटीकडे केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के पाटील यांनी राज्याचे कृषिमंत्री मा. ना. दत्तात्रय (दत्ता मामा) भरणे यांना निवेदनाद्वारे लक्ष वेधले आहे.

निवेदनात विजय म्हस्के पाटील यांनी नमूद केले आहे की, पेरणीची वेळ निघून गेल्यावर मिळणाऱ्या अनुदानाची उपयोगिता शून्य आहे.

हा केवळ तांत्रिक विलंब नसून, शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न आहे. सद्यस्थितीत पावसाळी अधिवेशन सुरू असल्याने, कृषिमंत्री महोदयांनी स्वतः यात लक्ष घालून संबंधित विभागाला तातडीचे निर्देश द्यावेत. या प्रशासकीय कोंडीमुळे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी, पात्र शेतकऱ्यांना त्वरित पूर्वसंमती मिळवून द्यावी, अशी आग्रही मागणी विजय म्हस्के पाटील यांनी केली आहे.

# गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मायेचा हात; राऊत सरांकडून ९० गणवेशांचे उदात्त दान

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : शिक्षक हा केवळ ज्ञानदाता नसून विद्यार्थ्यांच्या आयुष्यात आशेचा दीप प्रज्वलित करणारा आधारवड असतो, याचा प्रत्यय श्री छत्रपती मुलांचे हायस्कूल,भवानीनगर येथील दानशूर शिक्षक श्री संजय राऊत सर यांनी पुन्हा एकदा दिला. शाळेतील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना त्यांनी तब्बल ९० गणवेशांचे वाटप करून सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिले.आर्थिक अडचणींमुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य मिळविणे कठीण होते.अशा



विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलविण्याचे काम राऊत सर सातत्याने करत आहेत.दरवर्षी ते शाळेतील गरीब विद्यार्थ्यांना विविध स्वरूपात मदतीचा हात देत असून,त्यांच्या या सेवाभावी कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची नवी उमेद मिळत आहे.या उदात्त कार्याबद्दल श्री छत्रपती शिक्षण संस्थेचे सचिव श्री शब्बीर इनामदार यांच्या हस्ते संजय राऊत सरांचा सत्कार करण्यात आला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष पृथ्वीराज बापू जाचक व संचालक मंडळाने तसेच सचिव श्री इनामदार यांनी राऊत सरांच्या सेवाभावी वृत्तीचे मनापासून कौतुक केले त्यांच्या कार्यातून समाजापुढे आदर्श निर्माण होत असल्याचे गौरवोद्गार काढले.या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय यादव सर,सुनिल पवार सर,विजय चव्हाण सर सुमेध निंबाळकर सर,अमोल निंबाळकर सर,मारुती मासाळ सर,आकाश चव्हाण सर शिपाई अशोक माने तसेच शिक्षकवृंद व मान्यवर उपस्थित होते.

# सिल्लोडमध्ये वाढदिवसानिमित्त आ. विलास बापू भुमरे यांचा आ. अब्दुल सत्तार यांच्या हस्ते सत्कार

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : पैठण विधानसभा मतदारसंघाचे आमदार विलास बापू भुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त सिल्लोड येथील जनसंपर्क कार्यालय, शिवसेना भवन येथे एका विशेष अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आ. अब्दुल सत्तार यांच्या हस्ते आ. विलास बापू भुमरे यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी त्यांना निरोगी, दीर्घायुषी व यशस्वी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.या कार्यक्रमास




आ. सौ. अनुराधाताई चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच नगराध्यक्ष अब्दुल समीर, शिवसेनेचे तालुकाप्रमुख केशवराव तायडे, जि. प. सदस्य देविदास पालोदकर, शहरप्रमुख मनोज झंवर, कृउबा समितीचे संचालक तथा नगरसेवक नंदकिशोर सहारे, राजेंद्र ठोंबरे, युवासेनेचे धैर्यशील तायडे, प्रशांत क्षीरसागर, राजू गौर, राजुमिया देशमुख, सोनू जैस्वाल, सय्यद जब्बार, पंकज जैस्वाल, अजगर झारेकर आणि जमीर मुलतानी यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# सेवानिवृत्त प्राध्यापक गणेश खंडारे यांना भावपूर्ण निरोप समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी सचिन ठाकूर धामणगाव रेल्वे :** श्री संत शंकर महाराज उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रम पिंपळखुटा येथे कार्यरत प्रा. गणेश खंडारे हे नियत वयोमानानुसार दि. 30 जुन 2026 ला 32 वर्षाच्या प्रदिर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रामेश्वर नागपुरे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून शाळा समितीचे अध्यक्ष तथा संस्थेचे विश्वस्त रामदासजी दांगट होते. याप्रसंगी व्यासपीठावर माजी मुख्याध्यापक प्रमोद आंबटकर, प्रा. नंदकिशोर बुरघाटे, ईश्वर मेश्राम, सेवानिवृत्त शिक्षक ज्ञानेश्वर डेरे, रामेश्वरराव रुद्रकार,सत्कार मुर्ती प्रा. गणेश खंडारे,सौ.नंदाताई गणेशराव खंडारे उपस्थित होते. या दिवशी शाळेचा स्थापना दिवस, माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक जयंती कृषीदिन म्हणून



साजरी करण्यात आली. सर्व प्रथम मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमेचे पुजन करण्यात आले. तदनंतर एम. सी. व्ही सी. विभाग प्रमुख प्रा. आर. बी. देशमुख, स. शिक्षक चन्दशेखर थोरात, प्रा. विप्रा तायडे, प्रा. सुहास ठाकरे, राजु उईके यांनी आपले मनोगत व्यक्त करुन सराना दीर्घायुष्य निरोगी आयुष्य लाभो अशी मनोकामना प्रकट केली. यावेळी प्रा. खंडारे याचा सपत्नीक सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला. सरांना शाल. श्रीफळ, कपडे, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र, आणि भेटवस्तू देवुन गौरव शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी याच्या वतीने करण्यात आला. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विज्ञान शिक्षक अनंत डुमरे, प्रास्ताविक स. शिक्षक सुनील जीवतोडे, व आभार प्रदर्शन गणित शिक्षक नारायण चोरे यांनी केले. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# प्रेषित मुहम्मद पैगंबरांचा अपमान सहन करणार नाही – कॉ. सय्यद अनिस

## नाझिया इलाहीवर कठोर कारवाईची मागणी; सिल्लोड तहसीलसमोर भाकपची निदर्शने

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी :** आपला भारत देश सर्वधर्म समभाव जपणारा देश आहे. भारतात सर्व धार्माचे जातीचे लोक गुण्यागोविंदाने राहतात मात्र काही राजकीय पक्ष देशात धार्मिक अराजकता निर्माण करू पाहत असून अश्या नाजीया इलाही सारख्या महिलांना पुढे करीत असल्याचा आरोप भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सिल्लोड तालुका सचिव कॉ सय्यद अनिस यांनी करीत जातीय सलोखा आणि शांतता टिकवण्यासाठी नाझिया इलाहीवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, कारण तिने प्रेषित मुहम्मद पैगंबर आणि त्यांच्या पत्नीचा अपमान करून मुस्लिम बांधवांच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. तिला कठोर शिक्षा व्हावी आणि भविष्यात असे वक्तव्य करण्याचे धाडस तिच्याकडून होऊ नये. आम्ही काहीही सहन करू शकतो मात्र आमच्या पैगंबराचा कोणताही अपमान सहन करणार नाही असा इशारा कॉ सय्यद अनिस यांनी दिला.

यावेळी मौलाना अख्तर, मौलाना



शमशाद रझवी, कॉ त्र्यंबक शेजूळ, शेख अजिम यांनी देखील आपल्या भाषणात नाजीया इलाही हिच्यावर जोरदार टीका केली. यावेळी तहसील कार्यालयासमोर नाजीया इलाही हिच्या वक्तव्याविरुद्ध भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे निदर्शने करून नायब तहसीलदार मुंडे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधवांसाहित हिंदू बांधवांची उपस्थिती होती.

भाकप तर्फे दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या एका कथित आक्षेपार्ह व्हिडिओमुळे सिल्लोड तालुक्यातील व शहरातील मुस्लिम समाजामध्ये तीव्र संताप आहे. प्रेषित पैगंबर हजरत मुहम्मद तसेच हजरत आयशा (र.अ.) यांच्या संदर्भात कथितरीत्या अवमानकारक व धार्मिक भावना दुखावणारी वक्तव्ये नाझीया इलाही खान यांनी केली आहे. संबंधित व्हिडिओमधील कथित वक्तव्यांमुळे मुस्लिम समाजाच्या श्रद्धास्थानांचा अवमान झाला असून समाजाच्या धार्मिक भावना गंभीरपणे दुखावल्या गेल्या आहेत. हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्याने समाजामध्ये तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून सामाजिक सलोखा व कायदा-सुव्यवस्थेवर परिणाम होण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली असून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील लागू असलेल्या सर्व संबंधित कलमांनुसार तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारचे समाजात तेढ निर्माण करणारे व धार्मिक भावना दुखावणारे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित होऊ नयेत, यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करून संबंधित व्हिडिओ हटविण्याची कार्यवाही करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

याप्रसंगी शेख इसाक, शेख फेरोज, इरफान पठाण, देविदास दांडगे, बाळू पाटील शिन्दे, केशवराव ढोरमारे, हमिद पठाण, फहिम पठाण, सुनिता दांडगे, शेख अजिम, दादाराव सोनवणे, शेख शाकेर, शेख बाबा, शेख सोहेल, शेख आसीम, सुभान पठाण, शेख इमरान, शेख नदिम यांच्यासह हिंदू मुस्लिम बांधवांची उपस्थिती होती. यावेळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्यामसुंदर कौठाडे यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# ३२ वर्षांच्या ज्ञानतपस्येला मानाचा मुजरा ! उपशिक्षक संभाजी भोईटे यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय :** "शिक्षकाची सेवा संपते; पण त्याने घडविलेली पिढी आणि दिलेले संस्कार कधीच संपत नाहीत," याचा प्रत्यय श्री छत्रपती हायस्कूल,सणसर येथे पार पडलेल्या सेवापूर्ती गौरव समारंभात आला.

श्री छत्रपती शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती हायस्कूल, सणसर येथील उपशिक्षक संभाजी भिकुलाल भोईटे यांनी तब्बल ३२ वर्षे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक,नैतिक आणि सर्वांगीण जडणघडणीसाठी अविरत ज्ञानसेवा बजावत नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती स्वीकारली.त्यांच्या प्रदीर्घ, निष्ठावान आणि आदर्श सेवेला मानाचा मुजरा करण्यासाठी शनिवार,दि.४ जुलै २०२६ रोजी विद्यालयात सेवापूर्ती गौरव समारंभ मोठ्या उत्साहात व भावनिक वातावरणात संपन्न झाला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्री छत्रपती शिक्षण संस्थेचे संचालक शिवाजीदादा निंबाळकर तसेच प्रमुख




पाहुणे म्हणून संस्थेच्या संचालिका सुचिता सपकाळ,माजी संचालक संभाजी नाना निंबाळकर संजय (भैय्या) निंबाळकर,माजी चेअरमन विक्रम (भैय्या) निंबाळकर,माजी सरपंच विजय पाटील अशोक सर निंबाळकर,दिलीप बाबा निंबाळकर,हिंदुराव भोईटे,हनुमंत फौजी निंबाळकर, सचिन फुले,रोहीत पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.तसेच संस्थेच्या विविध शाखांचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,माजी विद्यार्थी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.मा.संभाजी भोईटे यांनी आपल्या ३२ वर्षांच्या सेवाकाळात हजारो विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच शिस्त,संस्कार,प्रामाणिकपणा आणि सामाजिक उत्तरदायित्वाची शिकवण दिली.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने केलेले कार्य विद्यालयासाठी प्रेरणादायी ठरले. त्यांच्या मार्गदर्शना खाली घडलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत असून, त्यांच्या यशामागे भोईटे सरांच्या संस्कारांचा मोठा वाटा असल्याचे मान्यवरांनी गौरवोद्गार काढले.यावेळी मान्यवरांच्या हस्ते भोईटे सरांचा शाल फेटा,श्रीफळ,पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन उभयंताचा सत्कार करण्यात आला.उपस्थितांनी उभे राहून टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या प्रदीर्घ ज्ञानसेवेला मानवंदना दिली. आपल्या मनोगतात भोईटे यांनी संस्था, सहकारी,विद्यार्थी आणि पालकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत शिक्षणातून संस्कारांची जोपासना हेच शिक्षकाचे खरे कर्तव्य असल्याचे सांगितले. भोईटे सरांची शासकीय सेवा आज पूर्ण झाली असली,तरी त्यांनी घडविलेल्या विद्यार्थ्यांच्या रूपाने त्यांची ज्ञानपरंपरा आणि संस्कारांचा वारसा पुढील अनेक पिढ्यांपर्यंत जिवंत राहणार आहे.एका आदर्श, कर्तव्यनिष्ठ आणि विद्यार्थीप्रिय शिक्षकाला दिलेला हा निरोप उपस्थितांच्या मनात कायमस्वरूपी कोरला गेला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाघमोडे सर यांनी केले तर आभार एस.पी भोसले सर यांनी केले.

# शेतीकामांसाठी गौण खनिजांवरील रॉयल्टी माफ; महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची ऐतिहासिक घोषणा

**दैनिक युवक आधार**
**ज्ञानेश्वर काळे प्रतिनिधी मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा आणि शेती विकासाला चालना देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. विधान भवनाच्या दोन्ही सभागृहात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतीसाठी आवश्यक असलेल्या गौण खनिजांवरील स्वामित्वधन (रॉयल्टी) पूर्णपणे माफ करण्याची ऐतिहासिक घोषणा केली.

या निर्णयानुसार, शेतकरी आता आपल्या शेततळे, विहिरी किंवा स्थानिक जलस्रोतांमधून शेतीकामांसाठी लागणारा गाळ, माती आणि मुरूम कोणतेही स्वामित्वधन न भरता काढू शकतील. या खनिजांचा वापर विहीर, शेतघर, जनावरांचा गोठा बांधणे, शेतरस्त्यांची दुरुस्ती तसेच इतर शेतीपूरक कामांसाठी करता येणार आहे.

सरकारने या प्रक्रियेसाठीही नियम सुलभ केले आहेत. स्थानिक जलस्रोतांमधून गाळ काढण्यासाठी संबंधित तलाठ्याकडून केवळ साधी ना-हरकत (एनओसी) घेणे आवश्यक राहील. ही परवानगी १५ दिवसांच्या आत देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, स्वतःच्या शेतातील माती, गाळ किंवा मुरूम शेतीच्या कामांसाठी वापरण्यास कोणत्याही प्रकारच्या परवानगीची आवश्यकता राहणार नाही.या निर्णयातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, शेतीच्या



कामांसाठी गाळ, माती किंवा मुरूम वाहून नेणाऱ्या शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टर, ट्रॉली किंवा बैलगाड्यांवर पोलीस अथवा महसूल विभागाकडून जप्ती किंवा पकडापकडीची कारवाई केली जाणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना अनावश्यक त्रासातून मोठा दिलासा मिळणार आहे.

तथापि, सरकारने स्पष्ट केले आहे की ही सवलत केवळ शेती आणि शेतकऱ्यांच्या वैयक्तिक वापरापुरतीच मर्यादित असेल. या गौण खनिजांचा कोणत्याही प्रकारे व्यावसायिक वापर, विक्री किंवा अवैध वाहतूक केल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल.राज्य सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांचा बांधकाम आणि शेती विकासावरील खर्च कमी होणार असून, जलसंधारणाची कामे, शेततळे, विहिरी, शेतरस्ते आणि इतर शेतीपूरक सुविधा उभारण्यास मोठी चालना मिळेल. त्यामुळे राज्यभरातील शेतकरी वर्गाने या निर्णयाचे स्वागत केले आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून बीएलओच्या कामांचा आढावा !!

## पात्र मतदाराची अचूक नोंद घ्या: जिल्हाधिकारी वर्षा मीना

**दैनिक युवक आधार**
**दिलीप कराळे प्रतिनिधी अकोला :** मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम जिल्ह्यात राबविण्यात येत असून त्या अनुषंगाने जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी विविध मतदान केंद्रांना भेट देऊन मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या कामांचा आढावा घेतला.

मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्या माध्यमातून मतदाराचे गणनापत्र भरुन घेण्याची प्रक्रिया जिल्ह्यात सर्वदूर सुरू आहे. त्याअनुषंगाने मोहिमेच्या अंमलबजावणीची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी अकोला शहर, बाळापूर, तसेच पातूर तालुक्यातील केंद्रांना भेट दिली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेश परंडेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे, तहसीलदार कुणाल झाल्टे, वैभव फरतारे यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते.

पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने फॉर्म वितरण, नागरिकांकडून परिपूर्ण माहिती भरून घेणे व त्यानुसार माहितीचे डिजिटायझेशन ही सर्व कामे विहित वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. प्रत्येक बाब जलद गतीने व दक्षतापूर्वक पूर्ण करण्याचे निर्देश



जिल्हाधिकाऱ्यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना दिले

सर्वप्रथम जिल्हाधिकाऱ्यांनी अकोला शहरातील खडकी येथील केंद्र, तसेच डाबकी रस्ता परिसरातील भिकमचंद खंडेलवाल विद्यालय येथील मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा घेतला. त्यानंतर पातूर येथील मराठी शाळा क्र. १, तसेच बाळापूर येथील शासकीय उर्दू अध्यापक विद्यालय, कासारखेड येथील शाळा आदी अनेक केंद्रांना भेट दिली. यावेळी जिल्हाधिका-यांनी मतदारांच्या घरी जाऊन प्रत्यक्ष प्रक्रियेचा पडताळा घेतला, तसेच मतदार बांधवांशी संवाद साधला.


नागरिकांनी बीएलओंना अचूक माहिती द्यावी.. गणनापत्र काळजीपूर्वक भरावे. आवश्यक कागदपत्रे जवळ ठेवा. मॅपिंगचे काम पूर्णत्वास न्यावे. नोंदींमध्ये त्रुटी राहता कामा नये. ही प्रक्रिया जलदगतीने राबवावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी सांगितले.

अचूक मतदार यादी ही सक्षम लोकशाहीचा पाया आहे. प्रत्येक पात्र मतदाराची योग्य नोंद होणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना आवश्यक ती अचूक माहिती द्यावी आणि विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# "पावसाच्या पहिल्या सरी अन् वलगणीच्या माशांची धूम

## गाबोळीच्या चवीने खवय्ये बेहाल!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा :** मॉन्सूनच्या पहिल्याच दमदार सरींनी कोकणातील खाड्या, नद्या, ओढे आणि शेतशिवारांना नवसंजीवनी दिली असून, त्याचबरोबर सुरू झाली आहे वलगणीच्या माशांची बहुप्रतीक्षित लगबग. वर्षभर प्रतीक्षा केल्यानंतर अवघ्या काही दिवसांसाठी उपलब्ध होणारे हे मासे बाजारात दाखल होताच खवय्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मासळी बाजारांत पहाटेपासून ग्राहकांच्या रांगा लागत असून, काही ठिकाणी तर मासे येण्यापूर्वीच त्यांची मागणी नोंदवली जात आहे.पावसामुळे नदी-नाले आणि खाड्यांमधील पाण्याची पातळी वाढताच विविध जातींचे मासे अंडी घालण्यासाठी प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने शेतांमध्ये, पाणथळ भागांमध्ये आणि ओढ्यांकडे स्थलांतर करतात. या नैसर्गिक प्रवासाला स्थानिक भाषेत 'चढण', 'उधवन' किंवा 'वलगण' असे म्हटले जाते. निसर्गाच्या या अद्भुत चक्रामुळे पावसाळयाच्या सुरुवातीलाच कोकणातील जलसंपदा अक्षरशः सजीव झाल्याचे चित्र दिसून येते.



सध्या बाजारात चिवणी, खुबे, कालवे, मुठे, शिवडा, मळे, अरळी, वाम, कोळंबी, शिंगटी आदी माशांची मोठ्या प्रमाणावर आवक होत आहे. या माशांना चवीसह पौष्टिकतेमुळेही विशेष मागणी असते. पहाटे पकडलेले मासे सकाळच्या बाजारात येतात आणि काही तासांतच विकले जातात. त्यामुळे अनेक ग्राहकांना अपेक्षित प्रमाणात मासे मिळत नाहीत.

वलगणीच्या माशांचे खास आकर्षण म्हणजे त्यामधील 'गाबोळी'. स्थानिक बोलीभाषेत अंड्यांना 'गाबोळी' किंवा 'पेर' असे संबोधले जाते. कुरकुरीत तळलेली गाबोळी, झणझणीत कालवण, नारळाच्या रसातील रस्सा किंवा पारंपरिक मसाल्यांमध्ये शिजवलेले पदार्थ यांची चव खवय्यांसाठी पर्वणीच ठरते. अनेक घरांमध्ये तर वलगणीचे मासे आल्याशिवाय पावसाळ्याची खरी सुरुवात झाल्याचे मानले जात नाही.या हंगामामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही मोठा हातभार लागतो. आगरी, कोळी, आदिवासी आणि इतर समाजातील अनेक कुटुंबांसाठी हा अतिरिक्त उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत ठरतो. पहाटेपासूनच जाळे, पाग, टोपल्या आणि पारंपरिक साधनांच्या सहाय्याने मासेमारी सुरू असते. अनेक गावांमध्ये महिला, पुरुष आणि तरुण मंडळी एकत्र येऊन या कामात सहभागी होत असल्याने पावसाळ्याच्या सुरुवातीलाच रोजगाराची संधी निर्माण होते.निसर्ग, परंपरा, खाद्यसंस्कृती आणि ग्रामीण अर्थकारण यांचा अनोखा संगम म्हणजे वलगणीच्या माशांचा हंगाम. पावसाच्या सरींसोबत सुरू झालेली ही चवदार लगबग सध्या कोकणातील बाजारपेठा, खाडीकाठ आणि खवय्यांच्या स्वयंपाकघरांमध्ये रंगत आणत असून, वलगणीच्या माशांची ही पर्वणी पुढील काही दिवस कोकणवासीयांच्या जिभेवर रेंगाळणार आहे.

## "भाळवणी येथील अबॅकस अकॅडमीचे पुणे –बालेवाडी या ठिकाणी झालेल्या परीक्षेत राष्ट्रीय स्तरावरती घवघवीत यश"



**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर):**-पुणे येथील बालेवाडी स्टेडियम मध्ये नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीयस्तरावरती अबॅकस परीक्षेमध्ये पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथे उपाध्ये अबॅकस अकॅडमीने दैदिप्यमान यश संपादन केले. या स्पर्धेसाठी अकॅडमीच्या तब्बल २२ विद्यार्थ्यांची निवड झाली होती. सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध केली असून प्रत्येक विद्यार्थ्यांना त्यांच्या रँकानुसार ट्रॉफी प्रदान करण्यात आली. विशेष म्हणजे "ईश्वरी अभिजीत जानकर हिने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स हा सर्वोच्च बहुमान पटकावला"तर वेदांत निलेश रोंगे याने "चॅम्पियन"हा मान मिळवत पंढरपूर नगरीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. या परीक्षेमध्ये महाराष्ट्र कर्नाटक गुजरात व इतर राज्यातील अंदाजे अडीच ते तीन हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. अशा या अत्यंत चुरशीच्या स्पर्धेमध्ये उपाध्ये अबॅकस अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी हे मिळवलेले यश निश्चितच उल्लेखनीय असल्याचे मानले जात आहे. या सर्व विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशामुळे पंढरपूरच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव वाढला असल्याची ही चर्चा होत आहे. या उल्लेखनीय यशामागे संचालिका सौ. गीतांजली उपाध्ये मॅडम यांचे नियोजन आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत आणि मार्गदर्शक सचिन कुमार उपाध्ये सर यांचे मोलाचे योगदान लाभले असल्याचे यशस्वी विद्यार्थ्यांचे पालक व ग्रामस्थांमधून बोलले जात आहे. या घवघवीत यशाबद्दल सौ. गीतांजली उपाध्ये आणि मार्गदर्शक सचिन कुमार उपाध्ये व सर्व यशस्वी विद्यार्थी यांच्यावरती सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होऊन कौतुक केले जात आहे.

# अकोटमध्ये 'प्लास्टिक मुक्त पर्यावरण' जनजागृती कार्यक्रम संपन्न !!

## धारिणी फाउंडेशन चा स्तुत्य उपक्रम !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी आकोट** : ३ जुलै रोजी जागतिक 'प्लास्टिक मुक्त दिन' निमित्त, प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरणावर होणारे गंभीर दुष्परिणाम लक्षात घेता, धारिणी फाउंडेशन अकोटच्या वतीने "प्लास्टिक मुक्त पर्यावरण ही काळाची गरज" या विषयावर भव्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षा स्थानी धारिणी फाउंडेशन च्या अध्यक्षा डाँ. मनीषा मते तर प्रमुख अतिथी म्हणून राजेश नागमते, दिलीप बोचे,माजी प्राचार्य संजय वालसिंगे,विजया बोचे यांची उपस्थिती लाभली होते.

या कार्यक्रमात उपस्थितांना प्लास्टिक पिशव्यांचा त्याग करून कापडी पिशव्या वापरण्याचे आवाहन करण्यात आले, तसेच कापडी पिशव्यांचे मोफत वाटपही करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले राजेश नागमते यांनी आपले विचार मांडताना सांगितले



की, प्लास्टिक मुक्तीचे हे अभियान यशस्वी करण्यासाठी महिला बचत गटांना सोबत घेणे आवश्यक आहे. महिलांच्या माध्यमातून हे अभियान घराघरात पोहचेल आणि कापडी पिशव्यांच्या वापराला मोठी चालना मिळेल.

दिलीप बोचे यांनी धारिणी फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. तसेच या अभियानाला नगर परिषद प्रशासन पूर्ण सहकार्य करेल आणि आमचा वैयक्तिक सहभाग नेहमी असेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**पातळ प्लास्टिक हे दैनंदिन जीवनातील मोठे संकट: डॉ. मनिषा मते**

कार्यक्रमाच्या अध्यक्षा, धारिणी फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा माजी नगराध्यक्ष डॉ. मनिषा मते यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्लास्टिकच्या धोक्यांवर प्रकाश टाकला.

त्यांनी सर्वांना "पातळ प्लास्टिक नकारा, कापडी पिशव्या वापरा" असा संदेश दिला. यासोबतच माजी प्राचार्य संजय वालसींगे आणि विजया बोचे यांनीही आपले मनोगत व्यक्त करत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

महिलांना मिळणार रोजगार, या उपक्रमांतर्गत धारिणी फाउंडेशनच्या सदस्यांनी कापडी पिशव्यांचे वाटप केले.भविष्यातही हे कार्य अविरत सुरू राहील असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या कापडी पिशव्यांच्या निर्मितीमुळे स्थानिक बचत गटातील महिलांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल, असा आशावादही यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन धारिणी फाउंडेशनच्या पर्यावरण प्रेमी सुरेखा माकोडे यांनी केले. प्रास्ताविक अर्चना सावरकर यांनी मांडले, तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन लता चिकटे यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धारिणी फाउंडेशनच्या सर्व सभासद वैशाली बाभुळकर, उज्वला तायडे, सुषमा मंगळे, विजया चौधरी, स्वाती चिखले, लता साबळे, वर्षा मानकर, पद्मा हिंगणकर, तरोडे ताई, दीपिका लेबडे आणि दुर्गा उदगीरकर यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. कार्यक्रमाला अकोटमधील अनेक पर्यावरण प्रेमी नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# पावसाळ्यापूर्वी मुंबईतील सर्व झाडांचे ऑडिट करा, शिवसेना सचिव शायना एन सी यांचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई/प्रतिनिधी -** चेंबूर येथील रोड नं. 11 वर 30 जून रोजी शालेय बसवर 60-70 वर्षे जुने पिंपळाचे झाड कोसळून 11 वर्षीय विहान श्रीवास्तव विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर पालिकेच्या निष्काळजीपणावर शिवसेना पक्षाने तीव्र आक्षेप नोंदवला आहे.पालिकेने सर्व झाडांचे 'ऑडिट झाले' हे सांगितले परंतु ढोंगीपणाचे लक्षण असून अजूनही मुंबईतील संपूर्ण झाडांचे ऑडिट झालेले नाही. तरी महापालिकेने मुंबईतील सर्व झाडांचे त्वरित ऑडिट करावे असा जाहीर इशारा शिवसेना सचिव शायना एन सी यांनी दिला.चेंबूर दुर्घटनेनंतर बीएमसीने दिलेला खुलासा म्हणजे जबाबदारी झटकण्याचा एक प्रकार आहे.त्यासाठी "आम्ही तपासणी केली असता 12 मे 2026 रोजी झाड 'निरोगी' असल्याचा अहवाल आणि 29 मे रोजी छाटणी केली, असे बीएमसी मात्र, रोड नं. 11 वरील मुळांना एप्रिल 2025 व जानेवारी 2026 मध्ये रस्ता काँक्रीटीकरणाच्या कामामुळे मोठे नुकसान झाल्याचे बीएमसीने स्वतःच्या चौकशीतून समोर आले आहे. यासाठी 3 अधिकाऱ्यांना निलंबितही केले गेले आहे."झाड पडणे निसर्गिक आहे" पण तज्ञांचे म्हणणे आहे की, मुसळधार पाऊस हे फक्त निमित्त आहे. खरे कारण आहे जुनी पोखरलेली झाडे आणि मुळांची निगा न राखणे हे आहे.

आम्ही या पडझड होणाऱ्या झाडाबाबत तक्रारी केल्या होत्या, पण महापालिकेने झाडांची पाहणी केली नाही. यासाठी आम्ही पावसाळ्यापूर्वी मुंबईतील सर्व धोकादायक झाडांची तृतीयपक्षीय तज्ञांमार्फत स्वतंत्र ऑडिट केले जावे. तसेच केवळ 'बाह्य तपासणी' नको, तर मुळांची सोनोग्राफी तपासणी बंधनकारक करावी. त्याचप्रमाणे महापालिकेच्या रस्ते विभाग व गार्डन विभाग यांच्यातील समन्वयाचा अभाव ही दुर्घटना घडण्याचे मुख्य कारण आहे. अशी माहिती आमदार तुकाराम काते यांनी दिली.नागरिकांच्या झाडांबाबतच्या तक्रारींकडे 'दुर्लक्ष' न होता, 72 तासांच्या आत कार्यवाही होईल अशी यंत्रणा महापालिकेने कार्यान्वित करावी.तसेच मृत विहानच्या कुटुंबाला ₹2.5 लाखांची मदत पुरेशी नाही. तर पालिकेने नैतिक जबाबदारी घेऊन किमान रुपये 10 लाख नुकसान भरपाई द्यावी.मुंबईकरांचे जीव हे बीएमसीच्या 'फायली' मधील आकड्यांपेक्षा अधिक महत्त्वाचे आहेत. बीएमसीने या सर्व प्रकारावर त्वरित कारवाई न केल्यास शिवसेना रस्त्यावर उतरून आंदोलन करेल, असा इशारा शिवसेना राष्ट्रीय सचिव शायना एन सी यांनी दिला.दिनांक 06 जुलै 2026 रोजी महापालिका आयुक्त यांना शिवसेना पक्षातर्फे याबाबतचे निवेदन देण्यात येणार आहे,

# मोढा बुद्रुक येथे कृषी सप्ताहानिमित्त शेतकरी मार्गदर्शन शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : कृषी विभागाच्या वतीने कृषी सप्ताहानिमित्त मौजे मोढा बुद्रुक (ता. सिल्लोड) येथे शेतकरी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी पार पडलेल्या या शिबिरात तज्ज्ञांनी आधुनिक शेती तंत्रज्ञान व पीक संरक्षणाबाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

शिबिरात प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी अधिकारी सुनील सूर्यवंशी यांनी सघन कापूस लागवड पद्धती, हुमणी अळीचे एकात्मिक नियंत्रण व खतांचा शास्त्रीय वापर याबाबत



सविस्तर माहिती दिली. विस्तार अधिकारी (कृषी) विश्वास बनसोडे यांनी मका व कापूस पिकातील आधुनिक तंत्रज्ञान, एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM) व बीज प्रक्रियेचे महत्त्व पटवून दिले. तसेच, सहाय्यक गट विकास अधिकारी आशिष मस्के यांनी कृषी सप्ताहाचे महत्त्व सांगून शासकीय घरकुल योजनेतील अडचणी व त्यावरील निराकरणाबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास सरपंच सौ. हावळे, संभाजी हावळे, राजेंद्र लांडगे, विस्तार अधिकारी जोगेंद्र अहिरराव यांच्यासह ग्रामस्थ व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आधुनिक तंत्रज्ञान व शास्त्रीय शेती पद्धतीची माहिती मिळाल्याबद्दल शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

# आसडीच्या गजानन विद्यालयात लोककलेचा जागर

## 'वासुदेव' परंपरेतून विद्यार्थ्यांवर मूल्यांचे संस्कार

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आसडी ( ता. सिल्लोड )येथे नुकताच 'वासुदेव आपल्या दारी' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. काळाच्या ओघात लोप पावत चाललेल्या लोककलेला नवसंजीवनी देण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमात नाथ महाराजांच्या परंपरेतील 'वासुदेव संस्थे'चे सादरीकरण करण्यात आले.या वेळी उपस्थित कलाकारांनी वासुदेवाच्या वेशभूषेत अत्यंत प्रभावी सादरीकरण करत विद्यार्थ्यांना लोककलेची ओळख करून दिली. आपल्या गायनातून कलाकारांनी राष्ट्रीय एकात्मता, श्रमभक्ती आणि



नैतिक मूल्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. लोककलेच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. या उपक्रमास शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री. गावंडे सर, तसेच सहशिक्षक सर्वश्री अपार सर, पाटील सर, खरात सर, जाधव सर, चव्हाण सर, देशमुख सर, बेंडाळे सर, काकडे सर आणि भागवत मिरगे यांची प्रमुख उपस्थिती होती. लोककला जपण्यासाठी विद्यालयाने घेतलेल्या या पुढाकाराचे परिसरातून कौतुक होत आहे.

# सर्व्हिस रोड तात्काळ सुरू करा; नागरिकांच्या जीवाशी खेळ थांबवा – जिल्हा परिषद सदस्या विद्या कुंभरे

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी -** राष्ट्रीय महामार्गावरील लाखनीजवळील मानेगाव सडक येथे सुरू असलेल्या भुयारी मार्ग (अंडरपास) बांधकामाच्या संथ गतीमुळे आणि ढिसाळ नियोजनामुळे बेळा–पोहरा–पालांदूर मार्गावरील प्रवाशांना, विद्यार्थ्यांना व स्थानिक नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. बांधकाम करणाऱ्या सीमा कंपनीने सर्व्हिस रोडची व्यवस्था न करता मुख्य रस्ता खोदल्याने वाहतूक धोकादायक बनली असून, दोन्ही बाजूंचे सर्व्हिस रोड तात्काळ सुरू करावेत, अशी जोरदार मागणी जिल्हा परिषद सदस्या विद्या कुंभरे यांनी केली आहे.

चुकीच्या नियोजनामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. भुयारी मार्गाचे काम सुरू करण्यापूर्वी नियमानुसार दोन्ही बाजूंनी सुरक्षित सर्व्हिस रोड तयार करणे अपेक्षित होते. मात्र, सर्व्हिस रोडची व्यवस्था न करताच मुख्य रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत करण्यात आल्याने नागरिकांना मोठा फटका बसत आहे. यामुळे पोहरा व पालांदूरकडे जाणारा थेट मार्ग बंद झाला असून, नागरिकांना बेळा मार्गे वळसा घालून प्रवास करावा लागत आहे.

बेळा–लाखनी हा पर्यायी रस्ता अरुंद असून त्याच मार्गावरून अवजड ट्रक, एसटी बस, ट्रॅक्टर आणि इतर वाहने धावत आहेत. त्यामुळे दुचाकीस्वार, लहान वाहनचालक आणि पादचाऱ्यांच्या जीवाला सतत धोका निर्माण झाला आहे. या मार्गावर कधीही गंभीर अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भंडारा आणि लाखनी येथे शिक्षणासाठी दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी या मार्गाने प्रवास करतात. धोकादायक वाहतूक, वाढलेला प्रवासाचा वेळ आणि असुरक्षित परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून पालकांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

"कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सर्व्हिस रोड लवकर सुरू करू, असे आश्वासन दिले होते. मात्र अनेक दिवस उलटूनही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. कंपनीच्या दिरंगाईमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे," अशी प्रतिक्रिया मानेगाव सडकचे उपसरपंच अजित मेश्राम यांनी दिली.

जिल्हा परिषद सदस्या विद्या कुंभरे यांनी प्रशासन, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि संबंधित कंपनीने या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन दोन्ही बाजूंचे सर्व्हिस रोड त्वरित वाहतुकीसाठी खुले करावेत, अन्यथा मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येणार नाही, असा इशाराही दिला आहे.

# वाहीटोला येथे बिबट्याचा वावर; गज्जू यादव यांच्या घरासमोरील व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर वनविभाग जागा!

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपुर :** गेल्या महिनाभरापासून वाहीटोला आणि परिसरामध्ये दहशत निर्माण करणाऱ्या बिबट्याचा एक थरारक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी तथा माजी पंचायत समिती उपसभापती उदयसिंह उर्फ गज्जू यादव यांच्या वाहीटोला येथील निवासस्थानासमोरील मॉयल (MOIL) ओल्ड डंप कम्पाउंडच्या भिंतीजवळ हा बिबट्या थेट गायीच्या गोठ्याकडे टक लावून बसलेला दिसून आला. ३० जून रोजी रात्रीच्या सुमारास कर्तव्यावरून परतणाऱ्या एका धाडसी परिचारिकेने (नर्स) या बिबट्याचा व्हिडिओ आपल्या मोबाईलमध्ये कैद केला. हा व्हिडिओ समोर येताच सुस्त असलेला वनविभाग अचानक सक्रिय झाला असून परिसरात बिबट्याचा शोध सुरू करण्यात आला आहे.

गाईच्या गोठ्यावर बिबट्याची नजर; धाडसी नर्सने केला व्हिडिओ जाहीर

वाहीटोला परिसरात गेल्या एक महिन्यापासून मॉयलच्या जुन्या डंप परिसरातून एक बिबट्या दररोज रेल्वे स्टेशनजवळील शेतात शिकारीसाठी जात-येत होता. अनेक नागरिकांनी त्याला प्रत्यक्ष पाहिले, मात्र भीतीपोटी कोणीही व्हिडिओ बनवण्याचे धाडस केले नाही. ३० जून रोजी हा बिबट्या थेट उदयसिंह (गज्जू) यादव यांच्या घरासमोरील मॉयलच्या संरक्षण भिंतीपाशी येऊन बसला आणि यादव यांच्या गोठ्यातील पाळीव जनावरांवर नजर ठेवून होता. त्याच वेळी शासकीय रुग्णालयातून नाईट ड्युटी संपवून घरी परतणाऱ्या एका नर्सने हिंमत दाखवून पृथ्वीराज यादव यांना फोन करून माहीत आणि पृथ्वीराज यांनी बिबट्याचा व्हिडिओ बनवला. हा व्हिडिओ समाजमाध्यमांवर वाऱ्यासारखा पसरल्याने वनविभागाची धावपळ उडाली आहे.

**वाहीटोलात तत्परता, मग देवलापारच्या आदिवासी भागात दुजाभाव का? : गज्जू यादव यांचा संतप्त सवाल**

या संपूर्ण प्रकरणावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना गज्जू यादव यांनी वनविभागाच्या दुटप्पी भूमिकेवर कडक शब्दांत बोट ठेवले आहे. "माझ्या घरासमोर बिबट्या दिसल्याची बातमी आणि व्हिडिओ व्हायरल होताच वनविभाग तात्काळ सक्रिय झाला, ही चांगलीच बाब आहे. परंतु, अशीच तत्परता देवलापार क्षेत्रातील दुर्गम आदिवासी भागात का दाखवली जात नाही? तिथल्या गरीब आदिवासींच्या आणि शेतकऱ्यांच्या जिवाला किंमत नाही का?" असा संतप्त सवाल यादव यांनी उपस्थित केला आहे.

**डोंगरताल भागात वाघाचा हैदोस; नागपूरच्या वनभवनातून मंजुरी मिळेना!**

सध्या देवलापार वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या डोंगरताल भागात एका पट्टेदार वाघाने धुमाकूळ घातला आहे. हा वाघ थेट रहिवासी भागात आणि शेतकऱ्यांच्या शेतामध्ये उघडपणे वावरत असल्याने शेतकऱ्यांनी शेतावर जाणे बंद केले आहे. स्थानिक वनविभागाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून या नरभक्षक/धोकादायक वाघाला जेरबंद (ट्रँक्युलाईज) करण्याचा रीतसर प्रस्ताव प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, वनभवन नागपूर यांच्याकडे पाठवला आहे.

परंतु, नागपूरच्या वातानुकूलित (AC) केबिनमध्ये बसलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना या दुर्गम भागातील आदिवासींच्या जिवाची काहीही काळजी नसल्याचे चित्र आहे. अनेक दिवस उलटूनही नागपूरच्या मुख्य कार्यालयातून या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आलेली नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या या लालफितीच्या कारभारामुळे डोंगरताल परिसरातील जनता भीतीच्या छायेखाली वावरत आहे.

**अप्रिय घटना घडल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निलंबनाची मागणी करणार : गज्जू यादव यांचा इशारा**

या बातमीच्या माध्यमातून गज्जू यादव यांनी वनविभागाच्या नागपूर येथील सर्वोच्च अधिकाऱ्यांना थेट आणि कडक शब्दांत इशारा दिला आहे. देवलापार आणि डोंगरताल भागात दहशत पसरवणाऱ्या त्या वाघाला पकडण्याचे आदेश तात्काळ निर्गमित करण्यात यावे. जर



वनविभागाच्या या दिरंगाईमुळे डोंगरताल किंवा देवलापार क्षेत्रात कोणत्याही नागरिकाचा जीव गेला किंवा काही अप्रिय घटना घडली, तर त्याला सर्वस्वी नागपूरचे वरिष्ठ अधिकारी जबाबदार असतील. अशा परिस्थितीत संबंधित जबाबदार वरिष्ठ अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करण्यात यावे, यासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा गज्जू यादव यांनी दिला आहे. वनविभागाने आता तरी कुंभकर्णी झोपेतून जागे व्हावे, अशी मागणी संपूर्ण तालुक्यातून होत आहे.

# सत्तेचा माज आणि मौनामुळे महाराष्ट्राची प्रतिमा मलिन"; राज ठाकरे यांचे मुख्यमंत्री फडणवीसांना खुले पत्र

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून एक सडेतोड खुले पत्र लिहित राज्यातील सत्ताधारी नेतृत्वाच्या कार्यपद्धतीवर आणि वाढत्या असंवेदनशीलतेवर तीव्र शब्दांत टीका केली आहे. सत्तेच्या अहंकारामुळे महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला धक्का बसत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

राज ठाकरे यांनी पत्रात म्हटले आहे की, केंद्रातील सत्ताधाऱ्यांना सत्तेचा माज आला असल्याची भावना देशभरातील जनतेमध्ये निर्माण झाली असून, त्याचा परिणाम आता महाराष्ट्राच्या राजकारणावरही दिसून येत आहे. महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेचा आणि येथील नेत्यांच्या सुसंस्कृत व संवेदनशील प्रतिमेचा देशभर गौरव केला जात होता. मात्र, गेल्या काही वर्षांत महाराष्ट्राचे राजकारणही काही मागास विचारांच्या राज्यांच्या पातळीवर जात असल्याचे दिसत असल्याची टीका त्यांनी केली.



राज ठाकरे यांनी सत्ताधारी पक्षाच्या एका आमदाराने आणि पदाधिकाऱ्याने लोकांच्या मृत्यूवर हसल्याचा उल्लेख करत, अशा प्रकारांवर कोणतीही कठोर कारवाई होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. "Power tends to corrupt, and absolute power corrupts absolutely" या प्रसिद्ध उक्तीचा संदर्भ देत त्यांनी सत्तेच्या गैरवापराबाबत इशारा दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संवेदनशील आणि सुसंस्कृत नेता म्हणून ओळख असल्याचे नमूद करत, अशा घटनांवर त्यांच्या मौनामुळे त्यांच्या संवेदनशीलतेबाबत प्रश्न निर्माण होत असल्याचेही राज ठाकरे यांनी म्हटले आहे.गेल्या ३७ वर्षांच्या राजकीय अनुभवाचा उल्लेख करताना, पूर्वी महाराष्ट्रात कोणत्याही पक्षाच्या नेत्याने स्वतःच्या पक्षातील चुकांवर पांघरूण घातल्याचे उदाहरण क्वचितच दिसून आले, असे त्यांनी नमूद केले. बाळासाहेब ठाकरे, शरद पवार आणि प्रमोद महाजन यांसारख्या नेत्यांनी पक्षनिष्ठेपेक्षा सार्वजनिक जबाबदारीला प्राधान्य दिल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

राज ठाकरे यांनी पुढे आरोप केला की, सत्ताधारी पक्षातील मंत्री आणि नेत्यांकडून वारंवार बेताल आणि असंवेदनशील विधाने होत असून, त्यावर मुख्यमंत्री कोणतीही भूमिका घेत नसल्यामुळे चुकीच्या प्रवृत्तींना प्रोत्साहन मिळत आहे. "तुमच्या मौनाचं नेमकं कारण काय आहे?" असा थेट सवालही त्यांनी पत्रातून उपस्थित केला आहे.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांकडून समाजाला योग्य संदेश देण्याची अपेक्षा कायम असते, असे सांगत राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांनी ही अपेक्षा भंग करू नये, अन्यथा त्यांची प्रतिमा केवळ स्वकीयांच्या चुकांना पाठीशी घालणाऱ्या नेत्याची राहील, असा इशारा दिला आहे. तसेच, अशा प्रवृत्तीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात चुकीचे पायंडे पडतील, अशी चिंताही त्यांनी व्यक्त केली.

पत्राच्या शेवटी, "तुम्ही सुज्ञ आहात. तुमच्याकडून अपेक्षा आहेत," अशा शब्दांत राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना आवाहन केले आहे.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मतदान शांततेत; आबासाहेब काळे यांच्या विजयासाठी शिवसेनेची जोरदार फिल्डिंग

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी सोयगाव शहरातील तालुका खरेदी-विक्री संघाच्या मतदान केंद्रावर शनिवारी उत्साहपूर्ण आणि शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. सकाळी ८ वाजता मतदानास प्रारंभ झाला असून दिवसभर मतदान केंद्र परिसरात निवडणुकीचा उत्साह पाहायला मिळाला.या निवडणुकीत सोयगावचे उमेदवार मा .आबासाहेब काळे यांच्या विरोधात उमेदवारी अर्ज दाखल केलेले समाधान गरुड यांनी मतदानापूर्वीच आबासाहेब काळे यांना जाहीर पाठिंबा दिल्याने निवडणुकीचे चित्र सुरुवातीपासूनच एकतर्फी झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती.मा.आबासाहेब काळे यांच्या विजयासाठी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सकाळपासून मतदान केंद्रावर ठाण मांडून मतदारांशी संपर्क ठेवला.उमेदवार आबासाहेब काळे हेही दिवसभर मतदान केंद्रावर उपस्थित राहून कार्यकर्त्यांशी संवाद साधत निवडणुकीच्या घडामोडींवर लक्ष ठेवून होते.एकूण ३६ मतदानांपैकी सकाळच्या सत्रात १४ मतदान झाले, तर उर्वरित मतदान दुपारच्या सत्रात पार पडले. संपूर्ण मतदान प्रक्रिया अत्यंत शांततेत, सुरळीत आणि कोणताही अनुचित प्रकार न घडता पूर्ण झाली.मतदानादरम्यान सोयगाव–सिल्लोड मतदारसंघाचे आमदार अब्दुल सत्तार यांनी मतदान केंद्राला भेट देत निवडणूक प्रक्रियेची पाहणी केली.तसेच जिल्हा परिषद सदस्या सौ.पुष्पाताई काळे यांनीही मतदान केंद्राला भेट देऊन उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची भेट घेतली.



यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र राठोड,तालुका प्रमुख धरमसिंग चव्हाण,नितीन अण्णा बोरसे,गटनेते अक्षय काळे,शहर प्रमुख तथा नगरसेवक संतोष बोडखे, बबलू हाजी,बंटीभाऊ काळे,कुणाल राजपूत,स्वप्निल पाटील,राजू दुतोंडे,कादिर शहा,रौफ काळू,गजानन कुडके,संदीप सुरडकर,दीपक पगारे, भगवान जोहरे,किशोर मापारी,संदीप चौधरी,ॲड.योगेश पाटील,समाधान काळे,रमेश गव्हांडे,मॉटी काळे,संकेत काळे यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी निवडणूक अधिकारी पी.एन. काचोळे,विलास घुगे,के.एफ. जरारे,पी.वाय.डोगरे,दिलीप रावणे, अशोक पाटील यांनी चोख नियोजन करत कामकाज सांभाळले.यावेळी सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक निरीक्षक दिनकर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मतदान शांततेत पार पडल्याने निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले असून शिवसेना उपजिल्हाप्रमुख आबासाहेब काळे यांच्या विजयाबाबत समर्थकांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण आहे.

## भरणे घाटातील महामार्गाला तलावाचे स्वरूप; पावसामुळे वाहतूक धोक्यात

### तातडीच्या उपाययोजनांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित** : रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका श्रीवर्धन तालुक्यातील दिघी पोर्ट–N753F महामार्गावरील भरणे घाटाला बसला असून, या मार्गावरील परिस्थिती अत्यंत चिंताजनक बनली आहे. अतिवृष्टीमुळे डोंगराचा काही भाग घसरून मोठ्या प्रमाणात माती तसेच लहान-मोठे दगड रस्त्यावर आले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या मार्गावर काँक्रीटीकरणाचे काम करताना रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक गटार किंवा जलनिस्सारण व्यवस्थेचे योग्य नियोजन करण्यात आले नसल्याने डोंगरातून वाहून येणारे पाणी थेट रस्त्यावर साचत आहे. परिणामी, रस्त्याच्या बहुतांश भागाला अक्षरशः तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.पाण्याखाली माती, दगड किंवा खड्डे नेमके कुठे आहेत याचा अंदाज येत नसल्याने दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनचालकांना



जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी आणि मुसळधार पावसात अपघाताचा धोका अधिक वाढत असल्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने प्रशासनाने तातडीने रस्त्यावरील माती व दगड हटवून पाण्याचा निचरा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, तसेच वाहतूक पूर्ववत सुरळीत करण्यासाठी युद्धपातळीवर काम हाती घ्यावे, अशी मागणी वाहनचालक व स्थानिक नागरिकांकडून होत आहे."एखादा गंभीर अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?" असा संतप्त सवालही नागरिक उपस्थित करत असून, संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी त्वरित कार्यवाही करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पावसाची साथ कमी

### धरणसाठा अजूनही १०% खाली

**मुंबई :** मुंबई, ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्याला पावसाने झोडपून काढले असले तरी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरण क्षेत्रात मात्र पावसाचा जोर कमीच आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठ्यात संथगतीने वाढ होत आहे. ३ जुलै रोजी सातही धरणातील पाणीसाठा ८.९३ टक्क्यांवर पोहोचला आहे. त्यामुळे मुंबईकरांना किंचित दिलासा मिळाला आहे. दरम्यान, पुढील काही दिवसांत धरण क्षेत्रातही पावसाची जोरदार हजेरी लागेल, असा अंदाज हवामान विभागाने



वर्तवला आहे.

मोडकसागर, भातसा, अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा, विहार, तुळशी व तानसा या सात धरणांतून मुंबईकरांची तहान भागवण्यासाठी रोज ४,१०० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो, तर वर्षभराची तहान भागवण्यासाठी धरणांत १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर पाणीसाठ्याची गरज भासते. सध्या सातही धरणांत ३ जुलै रोजी १ लाख २९ हजार ३०८ दशलक्ष लिटर पाणीसाठा उपलब्ध आहे.

धरणातील पाणीसाठ्यात घट झाल्याने १५ मेपासून १० टक्के पाणीकपात लागू करण्यात आली आहे. धरण क्षेत्रात पावसाने पाठ फिरवल्याने पाणीकपातीत आणखी वाढ करण्याची तयारी पालिका प्रशासनाने सुरू केली होती. मात्र, गेल्या आठवडाभरापासून धरण क्षेत्रात पावसाची संथगतीने रिपरिप सुरू असल्याने पाण्याच्या पातळीत हळुवार वाढ होत आहे.

## चिमुकल्या गौरव खरात प्रकरणी विधानभवनात आवाज उठवल्याबद्दल आमदार अर्जुनभाऊ खोतकर यांचा गौरव खरात परिवाराकडून सत्कार

**दैनिक युवक आधार**

**जालना,प्रतिनिधी** : जालना शहरातील चंदनझिरा परिसरातील चिमुकला गौरव खरात याच्यावर झालेल्या भटक्या श्वानांच्या जीवघेण्या हल्ल्याची गंभीर दखल घेत हा विषय महाराष्ट्र विधानभवनात प्रभावीपणे मांडल्याबद्दल आमदार मा. श्री अर्जुनभाऊ खोतकर यांचा आज गौरव खरात यांच्या परिवाराच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

यावेळी आमदार खोतकर यांनी चिमुकल्या गौरवची आपुलकीने विचारपूस करून त्याच्या प्रकृतीची माहिती घेतली. तसेच गौरवला धीर देत त्याचा सन्मानही केला. या भेटीमुळे



गौरवच्या कुटुंबीयांना मोठा मानसिक आधार मिळाला.

याप्रसंगी बोलताना कुटुंबीयांनी सांगितले की, एका सामान्य कुटुंबाच्या वेदनांना विधानभवनात आवाज मिळवून देत आमदार अर्जुनभाऊ खोतकर यांनी लोकप्रतिनिधी म्हणून आपले सामाजिक उत्तरदायित्व पार पाडले. त्यांच्या या संवेदनशील भूमिकेबद्दल परिवाराने कृतज्ञता व्यक्त केली.

या प्रसंगी जिल्हा संपर्क प्रमुख श्री पंडितदादा भुतेकर, श्री राहुलभाऊ हिवराळे, माळी महासंघ जालना जिल्हाध्यक्ष श्री संतोष रासवे, श्री प्रभाकर पवार तसेच श्री रामेश्वर गाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

शहरातील भटक्या श्वानांच्या वाढत्या समस्येवर तातडीने प्रभावी उपाययोजना करून नागरिकांच्या, विशेषतः लहान मुलांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.ही प्रेस नोट वृत्तपत्रात प्रकाशित होईल अशा व्यावसायिक शैलीत तयार करण्यात आली आहे.

## रोजगार हमीपलीकडे... विकसित गावांच्या नव्या युगाची सुरुवात

दोन दशकांहून अधिक काळ ग्रामीण भारताच्या रोजगार सुरक्षेचा आधार ठरलेली मनरेगा योजना आता नव्या स्वरूपात पुढे आली आहे. 'विकसित भारत – जी-राम-जी' हा कायदा १ जुलै २०२६ पासून देशभर लागू झाला आहे. नुकताच २ जुलै रोजी या योजनेचा केंद्रीय कृषी आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते देशव्यापी शुभारंभ करण्यात आला. पहिल्या दृष्टीक्षेपात हा बदल केवळ १०० दिवसांच्या रोजगार हमीऐवजी १२५ दिवसांची हमी देणारा वाटू शकतो; परंतु प्रत्यक्षात या कायद्याचा गाभा रोजगारापेक्षा गावाच्या विकास नियोजनात आहे. ग्रामीण भारताच्या विकासाची दिशा, ग्रामपंचायतींची भूमिका आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीची पद्धत बदलण्याचा हा महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे.

या कायद्यातील सर्वांत मोठा बदल म्हणजे 'विकसित ग्रामपंचायत आराखडा'. आजपर्यंत अनेक गावांमध्ये विकासकामे उपलब्ध निधी किंवा विभागीय योजनांनुसार निश्चित केली जात होती. आता प्रत्येक गावाने स्वतःच्या गरजा ओळखून ग्रामसभेच्या माध्यमातून पुढील काही वर्षांसाठी विकास आराखडा तयार करायचा आहे. गावात पाण्याची टंचाई कोठे आहे, कोणत्या शेतकऱ्यांना सिंचनाची गरज आहे, कुठे शेततळी आवश्यक आहेत, कोणत्या वस्तीला रस्ता हवा, कुठे वृक्षलागवड करायची, पशुपालन, रेशीम उद्योग, मत्स्यव्यवसाय, महिला बचत गट, युवकांचा कौशल्य विकास, तसेच हवामान बदलाशी सुसंगत कामे, या सर्व बाबींचा विचार एकाच आराखड्यात केला जाणार आहे. म्हणजेच आता ही केवळ 'काम शोधून देणारी योजना' न राहता 'विकास नियोजनावर आधारित रोजगार' ही संकल्पना प्रत्यक्षात येणार आहे.

या कायद्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विविध विभागांच्या योजनांचा समन्वय. आतापर्यंत कृषी, जलसंधारण, ग्रामविकास, वन, पशुसंवर्धन, पंचायत राज, महिला व बालविकास आदी विभागांच्या योजना स्वतंत्रपणे राबवल्या जात होत्या. परिणामी, अनेकदा एकाच गावात विविध विभागांकडून कामे झाली; मात्र त्यांच्यात परस्पर सुसंगती नव्हती. आता 'विकसित ग्रामपंचायत आराखडा' हा सर्व योजनांसाठी समान विकास आराखडा ठरणार आहे. त्यामुळे निधीचा अधिक परिणामकारक वापर होईल आणि निर्माण होणाऱ्या मालमत्ता दीर्घकाळ उपयुक्त ठरतील. हा बदल केवळ प्रशासकीय नसून विकासाच्या विचारपद्धतीतील मूलभूत परिवर्तन आहे.

ग्रामीण मजुरांच्या दृष्टीनेही हा कायदा महत्त्वाचा आहे. रोजगाराची कायदेशीर हमी १०० दिवसांवरून १२५ दिवसांपर्यंत वाढविण्यात आली आहे. कामाची मागणी करूनही विहित मुदतीत रोजगार उपलब्ध झाला नाही, तर बेरोजगारी भत्त्याची तरतूद कायम ठेवण्यात आली आहे. मजुरी वेळेत देणे बंधनकारक करण्यात आले असून विलंब झाल्यास भरपाई देण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. महाराष्ट्रासाठी चालू आर्थिक वर्षातील दैनंदिन मजुरी ३१७ रुपये निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्न सुरक्षेला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा आहे.

या कायद्यामुळे ग्रामसभेचे महत्त्वही लक्षणीयरीत्या वाढणार आहे. कोणती कामे करायची, कोणत्या कामांना प्राधान्य द्यायचे आणि गावाचा विकास कोणत्या दिशेने करायचा, याचा निर्णय आता ग्रामसभेतील चर्चेतून होणार आहे. लोकसहभागाशिवाय 'विकसित ग्रामपंचायत आराखडा' प्रभावी ठरू शकत नाही. त्यामुळे ग्रामसभा ही केवळ औपचारिक बैठक न राहता गावाच्या विकासाचे निर्णय घेणारे प्रभावी व्यासपीठ बनणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग, भूमिहीन आणि इतर वंचित घटकांच्या गरजांचाही विकास आराखड्यात स्वतंत्रपणे विचार करण्यावर भर देण्यात आला आहे.

या कायद्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तंत्रज्ञानाचा व्यापक वापर. डिजिटल नोंदणी, ई-केवायसी, ऑनलाइन उपस्थिती, जीआयएस-आधारित नियोजन, पोर्टलवर कामांची माहिती, निधी वितरणाचे डिजिटल व्यवस्थापन आणि सामाजिक लेखापरीक्षण यांमुळे पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा आहे. यामुळे केवळ कामांची नोंद ठेवली जाणार नाही, तर निर्माण झालेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष उपयोग, गुणवत्ता आणि परिणामकारकताही तपासता येईल. गावांचा विकास डेटा-आधारित पद्धतीने मोजण्याची संधी या प्रणालीमुळे उपलब्ध होणार आहे.महाराष्ट्राच्या दृष्टीने या कायद्यात मोठी संधी दडलेली आहे. राज्यात जलसंधारण, शेततळी, सिंचन विहिरी, फळबागा, रेशीम उद्योग, पशुपालन, चारागाह विकास, गाव तलावांचे पुनरुज्जीवन, ग्रामीण रस्ते आणि हवामान बदलाशी सुसंगत शेती यांसारख्या कामांना चालना देता येईल. विशेषतः दुष्काळग्रस्त भागांत पाणलोट विकास, पश्चिम महाराष्ट्रात जलव्यवस्थापन आणि विदर्भ-मराठवाड्यात नैसर्गिक संसाधन संवर्धनासाठी या कायद्याचा प्रभावी वापर होऊ शकतो. रोजगार उपलब्ध करून देतानाच उत्पादनक्षम आणि शाश्वत मालमत्ता निर्माण करण्याची संधी हा या कायद्याचा सर्वांत मोठा लाभ ठरू शकतो.

'विकसित भारत' हे केवळ राष्ट्रीय घोषवाक्य नाही; त्याची सुरुवात प्रत्येक गावातून होणार आहे. त्यामुळे या कायद्याचे यश किती दिवस रोजगार मिळाला यावर नव्हे, तर प्रत्येक गावाने किती सक्षम विकास आराखडा तयार केला, किती शाश्वत मालमत्ता निर्माण केली, ग्रामसभेचा सहभाग किती वाढवला आणि ग्रामीण अर्थव्यवस्था किती सक्षम केली, यावर मोजले जाईल. रोजगार हमी ही या कायद्याची सुरुवात आहे; परंतु विकसित, सक्षम आणि आत्मनिर्भर गावांची निर्मिती हेच त्याचे अंतिम ध्येय आहे.

**सचिन अडसूळ**
**जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर**

# असीम फाउंडेशन पुणे तर्फे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा LOC वरील उरी येथे भारतीय सैन्याच्या युनिटला भेट देण्यासाठी शैक्षणिक व प्रेरणादायी दौरा











देशाच्या एकात्मतेला बळकटी देणाऱ्या तसेच नागरिक आणि भारतीय सैन्य ह्यांच्यातील नाते अधिक दृढ करणाऱ्या उपक्रमाचा भाग म्हणून, असीम फाउंडेशन, पुणे यांच्यातर्फे उरी येथील रम्य व दुर्गम भागातील, Line of Control (LOC) वर तैनात असलेल्या राष्ट्रीय रायफल्स ला भेट देण्यासाठी तीन दिवसांचा शैक्षणिक आणि प्रेरणादायी दौरा आयोजित केला होता. ह्या दौऱ्यात महाराष्ट्रातील सोळा विद्यार्थी आणि असीम फाउंडेशन चे दोन स्वयंसेवक सहभागी झाले होते.

या तीन दिवसांच्या दौऱ्यात विद्यार्थ्यांना देशातील सर्वात कठीण भौगोलिक परिस्थितीत कार्यरत असलेल्या सैनिकांच्या जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची अनोखी संधी मिळाली. त्यांनी जवानांशी संवाद साधला, त्यांचा दिनक्रम पाहिला आणि शिस्त, सहनशक्ती आणि राष्ट्रसेवेच्या निष्ठेचा जवळून परिचय करून घेतला.

या काळात सहभागींनी कंपनी ऑपरेटिंग बेसला (COB) भेट दिली, नवनवीन शस्त्रास्त्रे आणि उपकरणांची झलक पाहिली, तसेच त्यांना LOC पलीकडील शत्रूच्या चौक्याही दाखवण्यात आल्या, ज्यामुळे त्यांना सीमावर्ती भागातील सैनिकांची जागरूकता, सज्जता आणि आव्हानात्मक जबाबदाऱ्या समजून घेता आल्या. याशिवाय उरी येथील नैसर्गिक सौंदर्याचा आणि तिच्या भौगोलिक महत्त्वाचा अनुभव घेताना त्यांनी या परिसराची ओळखही करून घेतली

दौऱ्यादरम्यान विद्यार्थ्यांनी काला पहार या सैन्य तळाच्या युनिट भेट देऊन कंपनी कमांडर यांच्याशी संवाद साधला. भारत आणि पाकव्याप्त काश्मीर जोडणाऱ्या कमान अमन सेतू ला भेट देण्याची संधी विद्यार्थ्यांना प्राप्त झाली.

बारामुल्ला येथील सैन्य दलाच्या डागर युनिट येथील दैनंदिन कामकाज प्रत्यक्ष अनुभवता आले. मेजर जनरल मनोज जोशी (GOC Dagger division) यांनी शिबिरातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि मनमोकळ संवाद साधला.

भारतीय सैन्य दल आणि असीम फाउंडेशन यांच्या संयुक्तविद्यमाने राबविल्या जाणाऱ्या चिनार युवा, बारामुल्ला या संस्थेतील विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली.

या भेटीत हिमालयातील उंचावरील सीमावर्ती भागातील कमांड आणि कंट्रोल यंत्रणा, नेतृत्व आणि ऑपरेशनल समन्वय याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले.

असीम फाउंडेशनच्या श्री. सारंग गोसावी यांनी सांगितले, "हा उपक्रम तरुणांना प्रेरित करण्यासाठी आणि आपल्या सीमांचे रक्षण करणाऱ्या सैनिकांचे धैर्य, शिस्त आणि निःस्वार्थ सेवाभावाशी त्यांना जोडण्यासाठी आयोजित केला होता. सीमावर्ती भागाशी मैत्रीचे नाते घट्ट करणे आणि तेथील परिसंस्था विकसित करणे. या उद्देशाने असीम फाउंडेशन विविध उपक्रम राबवित असते.

प्रणव कुलकर्णी याने भावना व्यक्त करताना सांगितले की "सैनिकांना आणि कमांडर्सना भेटणे, त्यांच्या परिस्थितीत काम करणे आणि त्यांचे आयुष्य जवळून पाहणे हा आमच्या आयुष्यातील अविस्मरणीय अनुभव होता. मला आता 'सेवा' आणि 'नेतृत्व' यांचा खरा अर्थ समजला."

या तरुण विद्यार्थ्यांची जिज्ञासा, शिस्त आणि उत्साह खरोखर कौतुकास्पद होता. अशा संवादांमुळे तरुण पिढीला सैनिकांच्या जीवनातील आव्हाने, गौरव आणि अभिमान लक्षात येतो आणि नागरिकांचे आणि सैन्याचे नाते अधिक घट्ट होते. या तरुणांच्या चेहऱ्यावर झळकलेला उत्साह म्हणजे भारताच्या उज्ज्वल भविष्याचे प्रतिबिंबच होते

हा उपक्रम असीम फाउंडेशनच्या युवा सहभाग, राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्र बांधणीशी बांधिलकीचा पुरावा असून, भारताच्या अतिदुर्गम सीमावर्ती भागात नागरिक–सेना यांच्या समन्वयाचा सुंदर संदेश देणारा ठरला.दौऱ्यातील सर्व सहभागींनी असीम फाउंडेशन आणि भारतीय सैन्याचे, मनापासून आभार मानले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने अंतर्गत २ लाखांपर्यंत कर्जमाफी तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन

**पालघर :** नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरूपी दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-2026' जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेले आणि ३१ मार्च २०२६ अखेरपर्यंत परतफेड न करू शकलेले पीक कर्ज असलेल्या पात्र शेतकऱ्यांना कमाल दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे.

याशिवाय, कर्ज वेळेवर फेडून आर्थिक शिस्त पाळणाऱ्या शेतकऱ्यांनाही शासनाने मोठा दिलासा दिला असून, नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. त्यामुळे प्रामाणिक कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे.

ही योजना राष्ट्रीयीकृत बँका, खाजगी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांनी स्वतःच्या निधीतून वितरित केलेल्या पीक कर्जांनाही लागू राहणार आहे. त्यामुळे राज्यातील मोठ्या संख्येने शेतकरी या योजनेच्या कक्षेत येणार आहेत.राज्य शासनाच्या या निर्णयामुळे नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास तसेच शेती क्षेत्रात नव्याने गुंतवणूक आणि उत्पादनवाढीसही हातभार लागणार आहे .



**ठाणे : ग्राहकांचे प्रेम, विश्वास आणि आशीर्वादाच्या बळावर पदपथावरील बाकड्यावरील दुकान ते भव्य दालनांचा सुवर्ण प्रवास, ही यशस्वी वाटचाल करणाऱ्या जयश्री कलेक्शनने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. ठाणे स्टेशन रोडवर बाजारपेठेत नव्या, सुसज्ज आणि तब्बल ४,००० चौ. फूट क्षेत्रफळाच्या ज्वेलरीचे भव्य शोरूम गुरुवारी ठाणेकरांसाठी खुले केले. या सुवर्ण दालनाचे उद्घाटन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ संभाजी शिंदे यांच्या सुविद्य पत्नी लताताई शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळोलकर, जयश्री कलेक्शनच्या संस्थापक संचालिका जयश्री रामाणे, शिवसेना गट नेते पवन कदम, नगरसेविका उषा विशाल वाघ, शिवसेना शहर प्रमुख हेमंत पवार, युवा सेनेचे ऋषिकेश माने यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या या सोहळ्याला नागरिक, ग्राहकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.यावेळी लताताई शिंदे यांनाही जयश्री कलेक्शन दालनातील आभुषणे खरेदी करण्याचा मोह आवरला नाही. जयश्रीताईनी त्यांना विविध प्रकारची आभुषणे स्वतः परिधान केली. या आदरतिथ्याने भारावत लताताई शिंदे यांनी नवरात्रीच्या देवीसाठीही दागिने व आभुषणे खरेदी केली.पदपथावरील हा व्यवसाय आज एवढ्या मोठ्या भव्य दालनात आला असला तरी, जयश्री कलेक्शनमध्ये सर्वसामान्य ग्राहकांपासून ते उच्चभ्रू वर्गापर्यंत प्रत्येकासाठी एकाच छताखाली आकर्षक, दर्जेदार आणि अलौकिक ज्वेलरी व विविध प्रकारची आभूषणे किफायतशीर दरात उपलब्ध असल्याचे जयश्री रामाणे यांनी सांगितले. ग्राहकांचा वाढता प्रतिसाद आणि विश्वास यामुळेच जयश्री कलेक्शनने आज १६ शाखांपर्यंतचा यशस्वी प्रवास खरोखरच अभिमानास्पद असल्याचे महापौर शर्मिला पिंपळोलकर म्हणाल्या.**

## भूमीपूजन व वृक्षारोपण उपक्रम संपन्न !





**वासिंद** - कृषी दिनाचे औचित्य साधून महिला विकास आर्थिक महामंडळाच्या प्रगती लोकसंचालित साधन केंद्र अंतर्गातील निसर्ग महिला शेतकरी उत्पादक गट संस्थेच्या आयोजित उपक्रमाचे भूमिपूजन व वृक्षारोपण करण्यात आले.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या प्रगती लोकसंचालित साधन केंद्र, गुंडे अंतर्गत असलेल्या निसर्ग महिला शेतकरी उत्पादक गट संस्था शेणवा यांच्या मंजूर राईस मिल शेड बांधकामाचे भूमिपूजन करुन गट संस्थेच्या जागेवर वृक्षारोपण करण्यात आले.

या प्रसंगी वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी संजय गर्जे, जिल्हा प्रकल्प सल्लागार हेमंत पाटील, प्रगती सीएमआरसी व्यवस्थापक विजया गवारी, गटसंस्था संचालक मंडळ, सीएमआरसी कमर्चारी वर्ग उपस्थित होते.

## आदिवासी आश्रमशाळेत अंमली पदार्थ विरोधी मार्गदर्शनपर उपक्रम !



**वासिंद** - वासिंद पोलिस ठाण्याच्या वतीने जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त श्री गाडगे महाराज आदिवासी आश्रमशाळा, भातसई व शासकीय आदिवासी आश्रमशाळा, वांद्रे (पिवळी) येथे अंमली पदार्थ विरोधी जनजागृतीपर रॅली काढून मार्गदर्शन करण्यात आले.

जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त विविध ठिकाणी जनजागृतीपर मोहीम हाती घेतली जात आहे. या अनुषंगाने पोलिस अधीक्षक विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली शहापूर तालुक्यातील वासिंद पोलिस ठाणे अंतर्गत येथील श्री गाडगे महाराज आदिवासी आश्रमशाळा, भातसई तसेच शासकीय आदिवासी आश्रमशाळा, वांद्रे (पिवळी) येथे अंमली पदार्थ विरोधी जनजागृतीपर रॅली काढून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

यामध्ये पोलिस निरीक्षक सुनील बच्छाव यांनी अमली पदार्थांच्या सेवनाने होणारे दुष्परिणाम या विषयी माहिती सांगून कोणी अमली पदार्थाचे सेवन करणार नाही याबाबत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी पो.नि. सुनिल बच्छाव, महिला पो.उप. नि. माधुरी भुरेवार, भातसई आश्रमशाळा संचालक भास्कर साठे, वांद्रे सरपंच मारुती साठे, मुख्याध्यापक मनोहर मडके, अधिक्षक दयानंद लोणे, महिला पो.ह. संगिता पाटील, पो.अंमलदार शैलेश दळवी, विजय गांजाळे, सूरज भांगरे, नितीन उगले आदी शिक्षक -शिक्षिकेतर, ग्रामस्थ उपस्थित होते.

## सिंधू महाकुंभाच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या संदेशाचे महाराष्ट्रात स्वागत व्हावे - विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** लडाख येथे आयोजित करण्यात आलेल्या ऐतिहासिक प्रथम सिंधू महाकुंभ मेळ्याबाबत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दयानंद सावंत यांनी लिहिलेला लेख दैनिक युवक आधार आणि तरुण भारत या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाला होता. या लेखाचे संकलन विधानसभा उपाध्यक्ष मा. ना. श्री. अण्णा बनसोडे यांचे जुने सहकारी श्री. संतोष निंभरे यांनी केले होते.

तीस वर्षांच्या अखंड सिंधू यात्रेचे प्रथमच सिंधू महाकुंभ मेळ्यात झालेले रूपांतर आणि त्या महाकुंभात बौद्ध लामा अध्यात्मिक गुरू पाल्गा रिंपोचे यांच्या हस्ते संपन्न झालेले सिंधू पूजन ही विशेष उल्लेखनीय बाब असल्याचे या लेखातून अधोरेखित करण्यात आले होते. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक आणि अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य इंद्रेश कुमार यांच्या दीर्घकालीन प्रयत्नांमुळे राष्ट्रीय एकात्मता, सद्भावना आणि सर्व पंथ समभावाचे साक्षात दर्शन या महाकुंभ मेळ्यात घडल्याचेही नमूद करण्यात आले होते.







हा लेख वाचल्यानंतर मा. ना. श्री. अण्णा बनसोडे यांनी श्री. संतोष निंभरे यांना दयानंद सावंत यांची भेट घडवून आणण्यास सांगितले. त्यानुसार झालेल्या या भेटीत सिंधू महाकुंभ मेळ्याचे महत्त्व, भारतीय संस्कृतीची विविधता आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेवर सविस्तर चर्चा झाली.

यावेळी मा. अण्णा बनसोडे यांनी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत तसेच पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत असलेल्या विविध संस्कृती, परंपरा आणि अध्यात्मिक विचारांचा संगम महाराष्ट्राच्या संतभूमीतही घडावा, अशी इच्छा व्यक्त केली. राष्ट्रीय समरसता, सामाजिक ऐक्य आणि भारतीय सांस्कृतिक वारशाचे जतन करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.दयानंद सावंत यांनीही सिंधू महाकुंभाच्या माध्यमातून संपूर्ण देशाला एकात्मतेचा आणि विश्वबंधुत्वाचा संदेश मिळत असल्याचे सांगितले. तथागत गौतम बुद्ध आणि भारतीय ऋषी परंपरेने दिलेला मानवकल्याणाचा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

दैनिक युवक आधारचे संपादक संतोष आमले, सहसंपादक मुकुंद कांबळे तसेच महाराष्ट्र संपादक अजय कापरे यांनी भविष्यात अशा राष्ट्रीय एकात्मतेच्या आणि भारतीय संस्कृतीच्या जतनासाठी आयोजित कार्यक्रमांमध्ये मिडिया पार्टनर म्हणून सक्रिय सहकार्य करण्याची भावना दयानंद सावंत यांच्याकडे व्यक्त केली.

भारतीय संस्कृतीतील विविधतेत एकता, सर्वधर्म समभाव आणि राष्ट्रीय समरसतेचा संदेश देणाऱ्या सिंधू महाकुंभासारख्या उपक्रमांची माहिती महाराष्ट्रातील जनतेपर्यंत पोहोचावी आणि संतांच्या भूमीतही अशा सांस्कृतिक संगमाचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.